म. ग्रं. सं. ठाणे
विषय काव्य
सं. क्र. १५८०



REFBK-0013485
REFBK-0013485

# गीतकृष्णायन

- म. पां. भावे.

साहित्य-रत्न माला, पुष्प १लें.

# गीतकृष्णायन

कवि : म. पां. भावे

गायक-सं. दिग्दर्शक : दशरथ पुजारी

REFBK-0013485
REFBK-0013485
९३४८५

साहित्य-रस माला

प्रकाशन संस्था

मूल्य : रुपया १-२५ न. पै.

: प्रकाशक :
साहित्य रस माला
नीतिन मॅन्शन,
७ वी खेतवाडी लेन
मुंबई ४.

ही आवृत्ती व पुढील सर्व आवृत्यांचे हक्क प्रकाशकांकडे.
प्रयोगाचे हक्क लेखकाचे स्वाधीन.

प्रथमावृत्ति
मार्च १९६३

: मुद्रक :
वि. सि. बोले
नवयुग प्रिंटींग प्रेस
६४९, डी. डी. रा. ब. सी. के. बोले रोड
दादर, मुंबई २८.

# सुदर्शन !

आमचे स्नेही श्रीयुत म. पां. भावे या भावनिष्ठ कवींची भगवान श्रीकृष्ण-चरित्रावरील ही गीतमाला पुरस्करितांना मला साभिमान आनंद वाटत आहे. बोलून चालून ही गीतमाला असल्यानें गीतांतील रसाविष्कार शब्दापेक्षां स्वराधिष्ठित असावा हें स्वाभाविक होय. अर्थात तरल, अर्थवाही, आणि स्वरसंवादी शब्दयोजनेनें गीतें हृदयाचा चपखल कबजा घेतात व या कसोटीवर ही गीत-माला व तिची गुणवत्ता तोलून पाहणें कांहींच्या मतें आवश्यक ठरलें असतें. तथापि मी तसें करूं इच्छित नाहीं. कारण हें पुरस्काराचें कार्य मी विशुद्ध स्नेहभावाच्या भूमिकेनें करीत असून, त्याचवेळीं तर्कशुद्ध समालोचकाची भूमिका स्वीकारणें मला विसंगत वाटतें. शिवाय तसें करण्याचें ज्या विशेष अधिकाराच्या जाणिवेपासून मी स्वतःस आजवर दूर ठेविलें आहे त्या अधिकाराचा मी बळी झालों असें होईल. तशी माझी इच्छा नाहीं. कारण मला स्वतःलाहि भावी काळांत भावनिष्ठच रहावयाचें आहे. जातां जातां एक व्यक्तिगत उल्लेख मात्र आवश्यक ठरतो. तो हा कीं श्री. भावे यांचा व्यवसाय काव्याला अजिबात पोषक नसलेला, त्यांचें जीवन धांवपळीचें, आणि सर्वसामान्य इच्छेच्या माणसाला सतत व्यग्र राखणारें असें असूनही त्यांनीं आजवर मराठी सारस्वताची जी सेवा केली आहे ती सारस्वतावरील उत्कट प्रेमामुळें व दुर्दम्य अशा इच्छाशक्तीच्या जोरावरच होय. शिवाय श्री. भावे हे वृत्तीनें प्रसिद्धी पराङ्मुख व स्वभावाचे अत्यंत सालस–थोडक्यांत म्हणजे चालू घडीच्या युग-धर्मापासून फार दूर राहणारे असे आहेत.

त्यांच्या गीतांत पदोपदीं सरळपणा–साधेपणा व अकृत्रिमता यांचा प्रत्यय येतो. तो या त्यांच्या स्वभावामुळेंच होय. त्यांचा स्वभाव व मी पुरस्कारित असलेली त्यांची गीतमाला यांतील संबंध मी मुद्दाम स्पष्ट केले. कारण काव्याच्या कितीही व्याख्या असोत. त्या सर्व व्याख्यांत अंतर्भूत असलेला एक अढळ गुण म्हणजे तळमळ ( Sincerity ) व या तळमळीचा प्रत्यय रसिकांस येथें आल्यावांचून राहणार नाहीं.

तळमळीचा हा गुण त्यांच्या स्वभावाचा स्थायीभाव आहे. व मला असा विश्वास वाटतो कीं. त्यांच्या हातून यापुढें जें काव्य व साहित्य लिहिलें जाईल तें आजकाल दुर्मिळ होत चाललेल्या या एका **गुणामुळेंही** रसिकांच्या आदरास पात्र ठरल्यावाचून राहणार नाहीं.

श्री. भावे यांच्या हातून मराठीची उदंड सेवा घडो.

**—पी. सावळाराम**

२६-२-१९६३

अनुक्रम ..........
आंक .......... नों. दि. ......

# लेखकाचें हृद्गत—

कविश्रेष्ठ ग. दि. माडगूळकर यांच्या "गीत रामायण" या अमर काव्यानें प्रेरित होऊन श्रीकृष्ण जीवनावर "गीत कृष्णायन" लिहिण्याचा प्रयत्न आपण करावा अशी मला प्रेरणा झाली. काव्यक्षेत्रांतील माझें स्थान हें बाल्यावस्थेसारखेंच आहे आणि म्हणूनच बालांनीं आपल्या प्रगतीसाठीं थोरांचा आदर्श व चांगल्या गोष्टींचें अनुकरण करण्याचा प्रयत्न केल्यास त्यांत कांहीं गैर ठरेल असं वाटत नाहीं. या दृष्टीनें काव्यदेवीच्या मंदिरांत प्रवेश करतांना या बालकानें काढलेली "श्री" असावी तितकी वळणदार असणार नाहीं, त्याचे बोलहि बरेचसे बोबडे असण्याचाच संभव फार. परंतु ह्याच वेड्यावांकड्या "श्री" चें व बोबड्या बालांचें पुढें वळणदार अक्षरांत अन् तेजस्वी वाणींत रूपांतर होण्याची शक्यता असते. अर्थातच मोठ्यांनीं त्याचं योग्य तें कौतुक करून त्यांस प्रोत्साहन देणं इष्ट ठरेल.

'गीत कृष्णायना" बद्दल माझ्या मनाची धारणा ही अशा प्रकारची आहे. माझी ही भूमिका वाचकांनीं लक्षांत घ्यावी ही नम्र विनंति. या काव्यांतील उणीवांची मला पूर्ण जाणीव आहे. काव्यदेवीच्या अंगावर चढविलेले अलंकार २२ कॅरेटस्चे नाहींत हेंहि मला मान्य आहे. परंतु ते निदान १४ कॅरेटस्चे तरी ठरावेत ही अपेक्षा.

हा अेक प्रयत्न आहे. पहिल्या प्रयत्नानें येणारा अनुभव जमेस धरून पुढील पाऊल टाकण्याकडे साहजिकच माझा कल आहे. आणि वाचकांच्या प्रेमाशीर्वादानें नि सतत प्रयत्नानें भावी कालांत मी काव्यक्षेत्रांत आणखी कांहीं प्रगति करूं शकेन असें वाटतें.

"गीत कृष्णायना" चे प्रयोग घडवून आणण्यासाठीं वेळोवेळीं हरतऱ्हेचें साहाय्य व प्रोत्साहन देण्याच्या कामीं जे जे आपुलकीनें पुढें आले त्या सर्वांचा मी अत्यंत ऋणी आहें. मुख्यतः सं. दिग्दर्शक व 'गीत कृष्णायना' चे गायक श्री. दशरथ पुजारी आणि त्यांचे साथीदार, त्याचप्रमाणें श्री. स. पां. जोशी

(संपादक 'सन्मित्र') श्री. नी. गो. पंडितराव, श्री. वसंतराव वांद्रेकर (खार), श्री. दामुअण्णा माळी, तसेच गायक श्री. राजाभाऊ कांबळे, गायिका कु लीला शेलार, श्री. शंकरराव देशपांडे (नाटककार), श्री. के. एस्. ऊर्फ शांताराम जोशी व माझे मित्र श्री. व्ही. सिन्नरकर (नेपथ्यकार) या सर्वांचा मी अतिशय आभारी आहें. याखेरीज अनेक मित्रांचें, नातलगांचें साहाय्यहि बहुमोलाचें लाभलें आहे. पण जागेअभावी क्रमशः नांवानिशी देणें अशक्य आहे त्याबद्दल क्षमस्व.

ठाण्यांत झालेल्या पहिल्या कार्यक्रमाचें अध्यक्षपद स्वीकारल्याबद्दल महाराष्ट्रकवि श्री. यशवंत दि. पेंढरकर व मुंबईतील पहिल्या कार्यक्रमाचें अध्यक्ष-पद स्वीकारल्याबद्दल सं. दिग्दर्शक श्री. वसंतराव देसाई यांचाही मी फार आभारी आहें.

महाराष्ट्राचे लोकप्रिय कवि श्री. पी. सावळाराम, यांनीं वेळांत वेळ काढून या पुस्तकास आपली बहुमोल प्रस्तावना दिल्याबद्दल मी त्यांचे मनःपूर्वक आभार मानतों. माझ्या दृष्टीनें मी हा एक सुयोगच समजतो.

अखेरीस नवोदितांना प्रोत्साहन देण्याचें स्वागतार्ह कार्य हातीं घेऊन माझ्या या पुस्तकाचें सुबक व आकर्षक रीतीनें प्रकाशन केल्याबद्दल मी **साहित्य रस-माला** चालकांचा व प्रकाशकांचा सदैव ऋणी आहें.

४६, आनंदाश्रम,
नौपाडा, ठाणें
१९–२–१९६३

आ. कृपाभिलाषी
—म. पां. भावे

# प्रकाशकाचें मनोगत

भारतदेशांतील अगणित प्रकाशन संस्थांच्या गर्दीतच एक नवी श्रमिका उदयास येत आहे. आणि तिचें नांव आहे **साहित्य-रस माला.** ही नवीन प्रकाशन संस्था महाराष्ट्रांत उदयास यावी ही गोष्ट महाराष्ट्रीय जनतेस अत्यंत उत्साहवर्धक वाटेल यांत संदेह नाहीं.

कोणत्याहि संस्थेचा भक्कम पाया हेंच तिचें पहिलें भांडवल असतें. साहित्य-रस स्पर्धेच्या स्फूर्तीनें निर्माण झालेली ही संस्था म्हणजे सरस्वती आणि लक्ष्मी ह्यांची अभिनव युति. साहित्य-रस स्पर्धा हीच मुळांत लक्ष्मी व सरस्वतीची प्रतिकृति असल्यामुळें तिच्यापासून स्फूर्ति घेणाऱ्या ह्या साहित्य-रस मालेला भांडवलाचा प्रश्नच उपस्थित होणार नाहीं. पाया तर असा भक्कम आहे. आतां त्यावर उभी राहणारी इमारत निरखून पाहणें हें रसिकांचें काम.

हल्लीं चालणाऱ्या बहुतांश प्रकाशन संस्था प्रतिथयश लेखकांच्याच कृतीचें प्रकाशन करतात आणि तें स्वाभाविकही आहे. पुस्तकरूपानें येत असलेलें साहित्य वाचणारा वर्ग आज मोठा दिसत आहेच. पण या मोठ्या संख्येंत पुस्तकें विकत घेऊन वाचणाऱ्यांची संख्या किती आहे हा संशोधनाचा प्रश्न आहे. लेखक आणि प्रकाशक जगायचाच तर पुस्तक खरेदी करून वाचणारा वर्ग आवश्यक असतो. तथापि लेखक नांवाजलेला नसला तर पुस्तक घेणार कोण ? आणि नवोदितांचीं पुस्तकें वाचणार कोण व छापणार कोण ? असे अनेक प्रश्न येथें उपस्थित होतात. या सर्व प्रश्नांना उत्तरें आहेत. आणि तीं कृतिपूर्ण देण्याच्या उमेदीनें आम्हीं पुढें होत आहोंत. आम्हांला आजतरी वाटते कीं, आजच्या प्रकाशकाच्या अंगीं नसलेल्या धाडसामुळेंहि नवोदितांची हेळसांड होते.

साहित्य-रस मालेचा प्रमुख उद्देश म्हणजे नवोदितांचें वेंचक व मौलिक साहित्य रसिकांपुढें आणणें हाच आहे. नवोदितांच्या प्रतिभांचीं प्रस्फुरणें रसिकांप्रत पोंचविण्यासाठीं साहित्य-रस मालेनें संकल्पकंकण बांधलें आहे. प्रकाशक ह्या

नात्यानें अम्हांला मिळणारा फायदा म्हणजे नवोदितांच्या साहित्यगुणांना उजाळा देऊन मराठी वाङ्मयांत घडेल-साधेल ती भर घालण्याचा प्रामाणिक प्रयत्न करणें एवढाच आहे. साहित्यासाठीं वाचकवर्ग आहे पण त्याला योग्य वळण लावावयास हवें आहे. म्हणून हें कार्य करतांनाच तयार वाचकांतून आम्हीं खरेदी करणाऱ्या वाचक वर्गालाहि वळण लावणार आहोंत. अल्प किंमतींत उच्च साहित्य देऊन हें वळण लावण्याचें कार्य आम्ही करूं शकूं असा आम्हांला विश्वास आहे.

रहस्यकथा आणि केवळ लैंगिक-योग पिसाट प्रवृत्तींच्या वाङ्मयाखेरीज जमेल त्या सर्वच प्रकारचें साहित्य साहित्य-रस माला प्रसिद्धीस आणणार आहे.

काव्याला वाचकवर्ग फार मोठा असतो पण किंमत देऊन, खरेदी करून वाचणारा वर्ग मात्र कमी. अशा परिस्थितींतसुद्धां मालेतर्फे येणारें पहिलें पुस्तक काव्याचें आहे. आणि ह्यासाठीं विषय मिळाला तोहि भगवान श्रीकृष्णाच्या जीवनाचाच. श्रीकृष्णाचें जीवन म्हणजे मानवी जीवनाचा संपूर्ण आविष्कार. भगवंतांचें चरित्र आणि चारित्र्य म्हणजे अनेक अंगांचा परिपोषच आणि अशा अलौकिक अवतारी पुरुषोत्तमाचें चरित्र काव्यरूपानें प्रसिद्ध करतांना त्या कृष्णाचाच आम्हांला आशीर्वाद लाभणार आहे अशी आमची मनोदेवता आम्हांला सांगत आहे.

नीतिन मॅन्शन,<br>७ वी खेतवाडी,<br>मुंबई ४.

देवेंद्र दलाल<br>प्रकाशक

अनुक्रम ........................ विः ..................
क्रमांक ........................ नोः दिः ..................
९३८५

# " गीतकृष्णायन "

यमुनेच्या तीरावर वसलेली मथुरा नगरी म्हणजेच मधुपुरी. मधुदैत्यानें वसविलेली ही नगरी. या मधुदैत्याचा रामचंद्राचा भाऊ शत्रुघ्न यानें पराभव केला. आणि तेव्हांपासून यमुनातीरावरील मधुपुरींत आर्यकुल नांदू लागलें.

## १ जिंकिली शत्रुघ्नें मधुपुरी

यमुना नदिच्या तिरीं
जिंकिली शत्रुघ्नें मधुपुरी ॥
रविराजाचें ग्रहण संपलें
सज्जन मोदें नांदु लागले
ताप जनांचे विलया गेले
पावन हो मधुपुरी १

सृष्टि मुखावर दिसे टवटवी
सकल जनांच्या चित्तां हंसवी
स्वातंत्र्याची फुटे पालवी
दास्य पळालें दुरी २

शत्रुघ्नानें विघ्न हारिलें
दैत्यांचें निर्दालन केलें
आर्यकुलाचें नांव राखिलें
वैभव शिखरावरी ३

याच आर्यकुलांतील राजा कंस. स्वभावानें अतिशय दुष्ट आणि सत्तालोलुप. सत्तेसाठीं जन्मदात्या मातापितरांना कैदेंत टाकणारा आणि प्रजाजनांना अतोनात छळणारा. कंसाच्या दुष्कृत्यांची वार्ता नारदाच्याहि कानीं गेली; आणि त्याला भेटण्यासाठीं म्हणून नारद मथुरेस येण्यास निघाले.

## २ पातले मथुरेच्या उपवनीं । महर्षी संगित चूडामणी

पातले मथुरेच्या उपवनीं
महर्षी संगित चूडामणी ॥
पायीं खडावा, भालीं चंदन
"जयनारायण" मंत्रोच्चारण
सवें चालले वीणावादन
ऐसे नारदमुनी १

हास्य मुखावर सदैव विलसे
मधुवाणी जिव्हेवर नाचे
हेतु मनांतिल कुणा न गवसे
धूर्त राजकारणी २

कळली वार्ता कंस नृपाला
वेगें भेटिस धांवुनि आला
नमस्कारिले देव ऋषीला
मोद जाहला मनीं ३

"मथुरापतिपद तुजासि लाभलें
ऐकुनि मानस माझें खुललें
धन्य नृपा तव भाग्य उदेलें
तुष्टलोंच मी मनीं" ४

" तुझ्या हिताचें मजला चिंतन
म्हणुनी आलों येथें धांवुन
विघ्नकालिंही ठेव शांत मन
ऐक लक्ष देउनी " ५

" तुला मारण्यासाठीं म्हणुनी
देवकि उदरीं पुत्र होउनी
विष्णू येतिल रूप घेउनि
आठवा सुत होउनी " ६

---

नारदांच्या या वार्तेनें कंस अस्वस्थ झाला. देवकीवसुदेव यांना ताबडतोब कारागृहांत टाकण्यांत आलें. देवकी प्रसूत होतांच तिचं प्रत्येक बाळ शिळेवर आपटून ठार मारण्याचा कंसानें सपाटा चालविला. आपल्या बाळाची ही निघृण हत्या बघून देवकी उदास झाली. वसुदेव तिचें सांत्वन करूं लागला. वसुदेव म्हणतो —

## ३ कां उदास होशि सखी सांग अंतरीं

कां उदास होशि सखी सांग अंतरीं
कर्मगती कधिहि कुणा चुकलि ना तरी ॥

पूर्व जन्मिचेंच पाप
देत आपणांसि ताप
नित्य स्मरूं ईश मनीं पाप ताप हारी १

टांकिच्या घावाविण
मूर्ति नसे घडत पूर्ण
मोक्ष मिळे घडतांची मृत्यू संगरीं २

अवसेचा तिमिर काल
नच टिकणें सर्व काल
उगवणार मोदमयी पुनव नंतरी ३

कंटकमय पथ असुनी
आक्रमिला जर हंसुनी
कीर्तिगंध दरवळतो मग दिगंतरीं ४

चंद्राची शीतलता
सूर्याची दाहकता
जीवनास त्यायोगें येत माधुरी ५

ठेव मनीं ईशभाव
तारिल तो भक्तिभाव
भक्तीच्या सामर्थ्यें चढुं यशोगिरी ६

---

परमेश्वरावर अढळ निष्ठा ठेवून ती दोघं राहूं लागली. कांहीं काळ लोटला. देवकीला आठव्यांदा दिवस राहिले. या बातमीनें कंस अस्वस्थ झाला. केव्हां एकदां देवकी प्रसूत होते आणि आपण त्या अर्भकाचा जीव घेतो असं त्याला झालं. तो मनांत म्हणत होता—

## ४ लागली चिंता रात्रंदिनीं—

देवकिचा सुत ग्रासिल मजला वदले नारदमुनी
लागली चिंता रात्रंदिनीं

आजवरी मी सात अर्भकें ठार मारिलीं तरी
तिळभरी शांति नसे मन्मनीं

अनुक्रम ........ विः ........
क्रमांक ........ नोंदि ........

मन कैसें माझें झालें वेडेपिसें
मजकडे पाहुनी जनता सारी हंसे
त्या सप्तजिवांची छाया भिववीतसे

कां दैवाची वक्रदृष्टि ही माझ्यावर जाहली
शिरिं जणूं पडते सौदामिनी

पराक्रमी ह्या बाहूंमधली शक्ति जणूं संपली
भासते ऐसे मज निशिदिनी १

भीतीचें वादळ उठलें चोंहीकडे
मृत्यूचें मजला स्वप्न सदोदित पडे
क्रोधाग्नि तशांतहि हृदयीं मम धडधडे

वीराची मम छाति परंतु काय घडतसे अजी
कळेना मजला ते याक्षणीं

काळाचा हा सर्प भयंकर, भिववी फुत्कारुनी
जणूं मज उठवी जगतांतुनी २

आशेनें बघतो अष्टदिशीं जेधवां
सर्वत्र देवकी पुत्र दिसे आठवा
स्वप्नांत बरळतो कुणी मजासि वांचवा

ध्यानिं मनीं अन् स्वप्नीं दिसते काळाची सांवली
मनाला रात्रंदिन टोंचणी

गर्भ आठवा देवकिचा जधिं नेइन नाशाप्रती
तेधवां स्थिरता येइल मनीं ३

———

आणि मग कृष्ण अष्टमीचा दिवस उजाडला. मध्यरात्रीचा समय. मुसळदार पाऊस आणि विजांचा कडकडाट यांचं तांडवनृत्य चालूं होतं. अशा वेळीं देवकी प्रसूत होऊन तिच्या पोटीं भगवान कृष्ण जन्माला आले. वसुदेवानें प्रसंगावधान राखून तशा भयाण काळोखांतही कृष्णाला नीट टोपलींत झांकून घेतलें आणि त्यांस आपला परमामित्र नंद यांजकडे नेलें. कर्मधर्मसंयोगानें यशोदाही याच वेळीं प्रसूत होऊन तिला मुलगी झाली होती. वसुदेवानें झटकन् बालकांची अदलाबदल केली. आणि यशोदेच्या मुलीस घेऊन तो तांतडीनें परत आला. इकडे कंसाला देवकी प्रसूत झाल्याचें वृत्त समजलें. तो त्या मुलीस शिळेवर आपटून ठार मारण्यास निघाला. ती त्याचे हातून निसटून विजेप्रमाणें वर गेली आणि त्याच वेळीं आकाशवाणी झाली,‘ हे कंसा, तुझे श्रम वाया गेलें आहेत. तुझा शत्रू सुखरूपपणें अवतरला आहे. ’

## ५ अवतरला ग अवतरला

अवतरला ग अवतरला
कंस नृपाचा काळ भूवरी देवकीनंदन अवतरला ॥

ऐक सखी ग ऐक सखी
गोष्ट सांगतें कानिं कशी
नंदाच्या गृहिं बाळ जन्मले, चल गे सांगूं झणिं
सकलां १

कृष्ण अष्टमी दिवस भला
विष्णु जन्मले नंदकुला
नंद यशोदा भाग्यवंत ती साक्षात् प्रभु हा अवतरला २

बाळ गोजिरें, मधु हंसरें
पाहतांच ग भान हरे
खुदकन हंसता गालीं तेव्हां शुक्र नभींचा मज गमला ३

आणि मग कृष्ण अष्टमीचा दिवस उजाडला. मध्यरात्रीचा समय. मुसळदार पाऊस आणि विजांचा कडकडाट यांचं तांडवनृत्य चालूं होतं. अशा वेळीं देवकी प्रसूत होऊन तिच्या पोटीं भगवान कृष्ण जन्माला आले. वसुदेवानें प्रसंगावधान राखून तशा भयाण काळोखांतही कृष्णाला नीट टोपलींत झांकून घेतलें आणि त्यांस आपला परमामित्र नंद यांजकडे नेलें. कर्मधर्मसंयोगानें यशोदाही याच वेळीं प्रसूत होऊन तिला मुलगी झाली होती. वसुदेवानें झटकन् बालकांची अदलाबदल केली. आणि यशोदेच्या मुलीस घेऊन तो तांतडीनें परत आला. इकडे कंसाला देवकी प्रसूत झाल्याचें वृत्त समजलें. तो त्या मुलीस शिळेवर आपटून ठार मारण्यास निघाला. ती त्याचे हातून निसटून विजेप्रमाणें वर गेली आणि त्याच वेळीं आकाशवाणी झाली,' हे कंसा, तुझे श्रम वाया गेलें आहेत. तुझा शत्रू सुखरूपपणें अवतरला आहे.'

## ५ अवतरला ग अवतरला

अवतरला ग अवतरला
कंस नृपाचा काळ भूवरी देवकीनंदन अवतरला ॥

ऐक सखी ग ऐक सखी
गोष्ट सांगतें कानिं कशी
नंदाच्या गृहिं बाळ जन्मले, चल गे सांगूं झणिं
सकलां १

कृष्ण अष्टमी दिवस भला
विष्णु जन्मले नंदकुला
नंद यशोदा भाग्यवंत ती साक्षात् प्रभु हा अवतरला २

बाळ गोजिरें, मधु हंसरें
पाहतांच ग भान हरे
खुदकन हंसता गालीं तेव्हां शुक्र नभींचा मज गमला ३

पाहुं तरी ग पाहुं तरी
दे ग यशोदा जरा तरी
किती ग बाई भाग्याची तूं, भाग्यरवी हा नंदकुला ४
नंदनृपाचें हृदय विशाल
सत्पात्रीं करि दान खुशाल
उत्साहाचा वसंत अवघा, घराघरांतुनि मोहरला ५
उत्सव केला दिन बारा
कुठे न दिसलें दैन्य जरा
" कृष्ण " म्हणोनी नाम ठेवूनी आनंदोत्सव भूषविला ६

---

कृष्ण हळुहळु मोठा होऊं लागला. तसतशा यशोदेच्या कानांवर कृष्णाच्या विविध खोड्यांबद्दल तक्रारी येऊं लागल्या " यशोदे, हा कृष्ण फारच खोडकर आहे बघ." आणि मग एकेकीनं आपल्या खोड्या सांगतांना यशोदेला म्हणावं—

## ६ कृष्ण तुझा यशोदा माते

कृष्ण तुझा यशोदा माते, खोड्या करी फार ग
खोड्या करुनि भलत्या सलत्या, छेडितो आम्हांस ग ॥

दुडूदुडू धांवत येतो
मंद मधुर गालीं हंसतो
नको नको आम्हा करितो
धेनुवत्सा सोडुनि देतो
आंचळासि लावुनि त्यांना धेनुदुग्ध संपवि ग १

किती सांगु कृष्ण प्रताप
उगिच बाइ देतो ताप
आणुनिया सारे गोप
विविध खोड्या करितो खूप
उंचावराल हंडि दह्याची फोडितो खुशाल ग २

काळवेळ नाहीं याला
रात्रिचाहि बसत उशाला
झोपिं जातां माझा छकुला
हळुच चिमटा घेइ त्याला
बाळ तधीं दुःखें रडतां हांसतो खुशाल ग ३

---

असेच कांहीं दिवस निघून गेले. कृष्ण फार खोड्या करीत होता म्हणून यशोदेनें एक दिवस त्याला अशोक वृक्षाला बांधून ठेवलें. त्या दोन वृक्षांच्या फटींतुन श्रीकृष्ण पलिकडे गेला आणि त्याच वेळीं काडकन् असा आवाज होऊन ते दोन्ही वृक्ष जमिनीवर कोसळून पडले पण कृष्ण थोडक्यांत बचावला. सर्वांना हायसे वाटलं. त्यावरून गप्पा निघतां निघतां सर्वांनीं ठरविलं कीं या गोकुळांत राहून आतां कांहीं उपयोग नाहीं. येथें कृष्णावर सारखी कांहीं ना कांहीं संकटें येत आहेत तेव्हां सगळयांनीं मिळून थोड्याच अंतरावर असलेल्या यमुनातीरावरील वृंदावनांत जाण्याचें ठरविलें आणि त्याप्रमाणें ते सारेजण नवीन वृंदावनांत जाण्यासाठीं निघाले.

## ७ हांसत नाचत जाऊं या—

हांसत नाचत जाऊं या । वृंदावन तें गाठूं या
यमुनाकाठीं रम्य आपुलें । नव गोकुळ तें उभवूं या १

तऱ्हेतऱ्हेचे वृक्ष किती । रंग संगती रम्य अती
हरिततृणाच्या सुंदरतेची । शोभा आपण पाहूं या २

नयन मनोहर जलाशयें । त्यांत विकसलीं कमलफुलें
कासाराच्या काठीं बसुनी । चित्त आपुलें रमवूं या ३

धेनु वांसरे घेऊनिया । गोवर्धन गिरि जाऊं या
हांसत नाचत स्वच्छंदानें । खेळ मजेनें खेळूं या ४

वाहत यमुना संथ विशाल । नौकेमधुनी जाऊं खुशाल
उड्या टाकुनी यमुना डोहीं । स्वच्छंदानें पोहूं या ५

विविध फुलांची सुंदरता । सुवास त्याचा दरवळता
शोभिवंत तें स्थान मनोहर । तेथे जाऊनि राहूं या ६

परस्परांवर प्रेम करूं । कृष्णासंगें नित्य रमूं
नव्या प्रदेशीं नवेपणानें । जीवन आपण घालवुं या ७

आम्रवनांतिल गर्द तरू । शीतल छाया ताप हरू
उत्साहानें सारे मिळुनी । एक दिलानें राहूं या ८

---

वृंदावनांत आल्यानंतर कृष्णानें यशोदेजवळ एके दिवशीं वनांत जाण्याच्या हट्ट धरला. त्याचा हा हट्ट साहजिकच यशोदेला आवडला नाहीं. ती त्याला त्या हट्टापासून परावृत्त करतांना सांगू लागली—

## ८ जाउं नको तूं वनीं—

जाउं नको तूं वनीं
येतसे भलतें सलतें मनीं ॥

लहान तूझे वय रे अजुनी
धाडुं कशी मी तुजला रानीं
मायेचे मजविणें न कोणी
हट्ट नको याक्षणीं १

रूप सानुल्या तुझें गोजिरें
भीति माझिया मनीं वावरे
दृष्ट कुणाची लागेलचि रे
जातां रानीं वनीं २

मार्गी कंटक रुततिल पाया
ऊन प्रखर हें सुकविल काया
करूं नको हें साहस वाया
करिते मी विनवणी ३

कितिक आपदा येउनि गेल्या
सद्भाग्यें त्या साऱ्या टळल्या
म्हणुनि सांगत्यें तुला सानुल्या
जाउं नको तूं वनीं ४

तिमिर लोपतो बघुनि प्रकाशा
कुलदीपक तूं अमुच्या वंशा
पालवली बघ अमुची आशा
म्हणुनी सांगते झणीं ५

---

अनुक्रम ५४८६९६ वि: ......
क्रमांक १५००० नों: दि: २४-३

परंतु कृष्णाच्या हट्टापुढें यशोदेला हार खावी लागली. तिनें कृष्णाला नीट सजविले. बरोबर शिदोरी दिली आणि सर्व गोपाळांना कृष्णाला नीट घेऊन जाण्याबद्दल तिनें पुन्हां पुन्हां बजावलं. कृष्ण येणार म्हणून सारे गोपाळ आनंदित झाले. ते जातां जातां आनंदानें नाचूं गाऊं लागले. ते म्हणूं लागले--

## ९. चल रे पेंद्या, चल रे विठू—

चल रे पेंद्या, चल रे विठू, खेळ खेळुं या विटिदांडू ॥
कृष्ण आपुला नवा गडी
आपण त्याचे सवंगडी
नाचत, खेळत, स्वच्छंदानें आम्रवनासी दौड करूं १
वृंदावनिं या रम्य हवा
नव्या पिढीचा डाव नवा
द्या रे टाळी, आतां झडकरी, वांटुनि घेऊं भिडूभिडू २
तुरे फुलांचे खोवुं शिरीं
पुष्प कंकणें बांधुं करीं
या कृष्णाला, घालुनि माला, गंमत जंमत खूप करूं ३
कधिं वृक्षावर उंच चढूं
सुरपारंबी कधिं खेळूं
आट्यापाट्या, हुतुतू, खो खो, तऱ्हेतऱ्हेचे खेळ करूं ४
कधिं खेळूं या शिवाशिवी
नित्य गाउं या गाणि नवी
फेर धरोनी, कृष्णाभंवती, आनंदानें नाच करूं ५
हरिचा वेणू मंजुळसा
ऐकुनि घालवुं शीण कसा
धेनु वांसरें, घेउनि सारे, सायंकाळीं परत फिरूं ६

———

कृष्ण संगतींत गोपाळांचा वेळ मजेंत जाऊं लागला. वडीलधाऱ्या माणसांनाहि कृष्ण संगतीची गोडी वाटूं लागली. सर्वांच्या खोड्या करण्यांत कृष्ण कुणालाही हार जात नसे. राधेचें तर कृष्णावर अतिशय प्रेम होतें. तिनें यमुनेवर पाणी भरण्यासाठीं जावं आणि कुठं तरी लपून बसलेल्या कृष्णानें पुढें येऊन तिची वाट अडवावी आणि मग लटक्या रागानें तिनें म्हणावं–

## १० या राधेला अडवुं नको—

कृष्णा पुरे ना, थट्टा किती ही, खडा घड्याला मारुं नको
या राधेला अडवुं नको ॥

जलामृतें हा घट भरलेला
घेउनि जाणें मजसि घराला
सोड वाट रे झणिं गोपाळा
घरीं परतण्या उशिर नको १

हिसळत जल हें भिजते साडी
असली कसली भलती खोडी
काय वाटते तुजला गोडी
वृथा मुकुंदा अडवुं नको २

तुझ्या संगतीं क्षणभरि येता
विसरुनि जाते काम सर्वथा
ओढ लागते माझ्या चित्ता
भुरळ मनाला पाडुं नको ३

———

[हें गीत H. M. V. कडे रेकॉर्ड होऊन सौ. माणिक वर्मा यांनीं गायिलें आहे.]

कृष्ण मुरलीची मोहिनी तर काय वर्णावी? आबाल, वृद्ध पशु-पक्षी साऱ्यांना त्या मुरलीनें अक्षरशः वेड लावलें. त्या नादब्रह्मांत सारेजण देहभान विसरत. त्या आनंदाचें वर्णन काय करावें?

## ११ मनाला भुरळ पाडितो हरी—

वाजवुनी बांसरी
मनाला भुरळ पाडितो हरी ॥
मोहक मंजुळ मुरलीचे स्वर
गोडि तयांतिल अतिशय सुखकर
कानीं पडतां खुलतें अंतर
अद्भुत ही बांसरी १

कानीं येतां मंजुळ सुस्वर
वैरभाव ते विसरुनि क्षणभर
समस्त प्राणी जमती भरभर
मोहमयी बांसरी २

अमृतमय तव मुरली वादन
चराचराला टाकी व्यापुन
त्या नादानें डोलत त्रिभुवन
ऐसी ही बांसरी ३

या मुरलीची अगम्य करणी
गोकुळांतल्या साऱ्या गौळणी
धांवत येती काम सोडुनी
भुलवी सकलां हरी ४

———

अशा रीतीनें कृष्ण सर्वांचा आवडता झाला. त्याच्यावर साऱ्यांची प्रीति होती तोंच एक नवीन आपत्ती गोकुळावर कोसळली. वृषभासुर नामक एका अवाढव्य आणि धिप्पाड अशा बैलानं गोकुळांत धुमाकूळ घालायला सुरवात केली. त्याच्या भयंकर डरकाळीनें सारेजण भयभीत झाले. आपल्या ढुसींनीं घरें पाडायला आणि शिंगांनीं निरपराध बालकांचे बळी घ्यायला त्यानें सुरवात केली. सर्वजण अगदीं हतबल झाले.

## १२ डरकाळित डरकाळित वृषभासुर आला

डरकाळित डरकाळित वृषभासुर आला
वृंदावनिं भीतीचा डोंब उसळला ॥

धष्ट पुष्ट तनु विशाल
डोळे ते लाल लाल
राक्षसासमान जणूं डरकाळित आला १

उडवित धुळ गगनातें
देत ढुशी सर्वांतें
घुसळित वपु, तुडवित शिशु, धांवत हा आला २

ऐकुनिया डरकाळी
भयभेसुर किंकाळी
फोडुनिया नरनारी करिति गलबला ३

कृष्ण वदे—"धीर धरा
लोळवीन यासि पुरा
मृत्यूचा मार्ग यासि करिन मोकळा" ४

कृष्ण उभा सामोरी
बघुनि वृषभ चाल करी
चवताळुनि वेगें मग धांवुनिया आला ५

कर कोमल कृष्णाचे
बल तथापि रामाचें
सहज धरुनि शिंगांना त्यासि रोखिला ६

झटपट करि क्षणमात्रे
गलित झालि परिगात्रे
श्रीकृष्णाच्या हस्तें मृत्यु लाभला ७

---

एका आपत्तीचें निवारण करून कृष्णानें सर्वांना आश्चर्यचकित केले. तोंच दुसरी आपत्ती पुढें उभी राहिली. यमुनेच्या डोहाजवळील मैदानांत सारे गोपाळ चेंडूचा खेळ खेळत होते. खेळतां खेळतां त्यांचा चेंडू कालियानामक डोहांत जाऊन पडला. त्या डोहांत कालियानामक महाभयंकर विषारी सर्प राहात असे. त्यामुळें त्या डोहांत उतरण्याचें साहस कोणीच करूं शकले नाहीं. साहजिकच सारे गोपाळ कृष्णाकडे आले. ते त्याला म्हणाले.

## १३ कृष्णा अमुचा यमुनाडोहीं चेंडू पडला रे—

कृष्णा अमुचा यमुनाडोहीं चेंडू पडला रे
डोहामध्यें नाग कालिया लपून बसला रे १

महाभयंकर विषरूपी ते सोडुनि फूत्कार
भिववी सकलां, परपीडक हा झालासे फार २

म्हणुनि कृष्णा आम्हाला रे भय वाटे भारी
तुझ्यावांचुनि या विघ्नांतुनि कोण अम्हा तारी ३

ऐकुनि सगळे कृष्ण वदे मग "थांबा क्षणमात्र"
झरझर झरझर वृक्षावरती चढला वेगांत ४

कदंबवृक्षावरुनि तेधवां डोहिं उडी घाली
उन्मत्ताची घटका आतां भरत पुरी आली ५
चिडुनि कालिया फणा उगारुनि फूत्कारित आला
श्रीकृष्णाला विळखे घालुनि आंवळुनी धरिला ६
क्षणांत त्याची दाबुनि धरली नरडी कृष्णानें
झणीं कालिया करूं लागला वळवळ जोरानें ७
ओकुं लागला रक्त मुखांतुनि भळ भळ भळ लाल
शिरी तयाच्या थयथय नाचे गिरिधर गोपाळ ८
"यमुनेचा हा डोह सोडुनी जा तूं तात्काळ
मान्य असे जर, तर मी सोडिन" वदला गोपाळ ९
'शरण शरण मी तुला माधवा सोड सोड फांस"
वृंदावनिचा आणि संपला तेथुनि वनवास १०

---

कृष्णानें कालियाला डोह सोडून जाण्यास भाग पाडले. यामुळें सर्वत्र आनंदीआनंद झाला. आतां प्रतिवर्षाप्रमाणें इंद्रोत्सवापेक्षां आपल्याला आश्रय देणाऱ्या, आपल्या गुरावासरांना चारा पुरविणाऱ्या या गोवर्धन पर्वताचीच पूजा आपण करावी असें कृष्णानें सुचविलें. त्याप्रमाणें गोवर्धन पर्वताच्या पूजेचा उत्सव अतिशय थाटानें पार पाडण्यांत आला. त्याच रात्रींची गोष्ट. दिवस पावसाळ्याचे नव्हते पण आकाशांत एकाएकी मेघ जमा झाले मेघांचा गडगडाट आणि कानठळ्या बसविणारा विजांचा कडकडाट सुरू झाला. मुसळधार पावसास सुरवात झाली. सारे गोकुळ वाहून जाण्याची वेळ आली. सारेजण कृष्णाला दूषण देऊं लागले. इंद्रोत्सव केला नाहीं म्हणूनच हें सकट इंद्रानें धाडलें आहे याबद्दल साऱ्यांची खात्री झाली.

## १४ कडकडते वीज नभीं—

कडकडते वीज नभीं, नभ आलें अंधारुन
कोसळतो मुसळधार, पाऊस हा रात्रंदिन १

इंद्रोत्सव नच केला, कोपें कां म्हणुनि इंद्र ?
त्यायोगें धारण करि, पाऊस कां रूप रुद्र ? २

कृष्णा तुज ऐकुनिया, इंद्रासी नच पुजिलें
इंद्रानें आम्हांवरि, संकट बघ धाडियलें ३

जलमय बघ झालें हें, गोकुळचि अवघे रे
संकट अति भयकारी, प्राणावरि आलें रे ४

धेनु पहा वत्सासम, ओरडती हंबरती
थोर सान सर्वांना, मरणाची बघ भीती ५

कृष्णः–"सोडा रे खिन्नताच, हंळुहळु या मजपाठीं
जाउं चला सारेजण, गोवर्धनगिरि भेटी" ६

ऐकुनिया कृष्णवचन, आशा मनिं उद्भवली
निघति सर्व कृष्णासह, मनिं श्रद्धा अंकुरली ७

कृष्ण वदे "मित्रांनो, घ्या रे घ्या नेत्र मिटुन
सद्भावें सर्व मिळुन, करु या रे प्रभु चिंतन" ८

नामाच्या जयघोषें आसमंत दुमदुमला
कृष्णानें अंगुलिनें गोवर्धन उचलियला ९

धन्य धन्य रे कृष्णा, अघटित ही तव लीला
अद्‌भुत तव करणीनें, वांचविशी तूं सकलां १०

---

कृष्णाची ही अघटित कृत्यें कंसाच्या कानांवर गेली आणि कृष्ण हाच आपला शत्रु आहे याबद्दल त्याची खात्री झाली. कांहींही करून कृष्णाला आतां कपटानेंच ठार केलें पाहिजे असा त्यानें मनाशीं बेत आंखला. त्यासाठीं धनुर्याग करण्याचे त्यानें ठरविलें. परंतु आपल्या बोलावण्यावर कृष्ण येणार नाहीं याबद्दल त्याची खात्री होती म्हणून या कामीं त्यानें नंदाचा परममित्र अक्रूर यांस नंदाकडे पाठविले. फार दिवसांनीं आपला मित्र भेटला म्हणून नंदास फार आनंद झाला. पण याच भेटींत अक्रूरानें कृष्ण जन्माचें रहस्य प्रथम नंदाला सांगून आपल्या येण्याचें कारण सांगितलें.

---

## १५ मित्रा तुज गुपित एक आज सांगतों रे—

मित्रा तुज गुपित एक आज सांगतों रे
कृष्ण बाळ देवकिच्या उदरिं जन्मला रे ॥

माझें हें वृत्तकथन
तव मानस करिल खिन्न
परममित्र म्हणुनि तुला सत्य सांगतों रे १

मानुं नको खेद मनीं
ही सारी प्रभुकरणी
सुकृत तव थोर म्हणुनि कृष्ण लाभला रे २

विष्णूचें रूप कृष्ण
कंसाचा काळ जाण
सद्भाग्यें तर गृहिं हा प्रभुचि वाढला रे ३

कृष्ण प्रभू जन्मताच
वसुदेवें केलि मात
वहिनींच्या ओटित हें बाळ घातलें रे ४

अनुक्रम ........ वि: ........
क्रमांक ........ नों दि ........

उदरींची तव कन्या
कंस निघे माराया
नांदे ती स्वर्लोकीं, अमर जाहली रे ५

———

कृष्ण जन्माची सत्यकथा अक्रूराच्या तोंडून ऐकल्यामुळें नंद कांहींसा अस्वस्थ झाला. परंतु केव्हांतरी हें ऐकावं लागलंच असतं असा विचार करून त्यानें मनाला सावरलं. नंतर अक्रूरानें आपल्या येण्याचं कारण नंदास सांगून कृष्णास धनुर्यागासाठीं पाठविण्याची परोपरीनं विनंती केली. कृष्णास कसलेंही भय नसल्याबद्दल त्यानें नंदाची खात्री पटाविली. मोठ्या कष्टी अंतःकरणानें नंदानें कृष्णाला पाठविण्याचें कबूल केलें. त्याप्रमाणें कृष्ण मथुरेस जाण्यासाठीं निघाला आतां आपल्याला कृष्णाचा विरह सहन करावा लागणार या कल्पनेनें साऱ्या गोकुळावर खिन्नतेची दाट छाया पसरली—

## १६ सांवळा सोडित वृंदावन

सांवळा सोडित वृंदावन
जाहले सर्वंहि जन खिन्न
तयांचा आवडता कृष्ण
चालला गोकुळ सोडून १
गायी हंबरती
मुखानें पक्षी किलबिलती
गोळणी गेल्या गहिंवरुन
संपलें गात्रांतिल त्राण २
मुरली मंजुळ ती
तियेची गोडी अनुपमची
ऐकणें आता कोठून
चालला अमुचा श्रीकृष्ण ३

गोपी हळहळती
तयांची हरिवर अति प्रीती
जातसे त्यांना सोडून
स्मृती ती मागें ठेवून ४

अश्रू घळघळती
मुखानें शब्दहि नच फुटती
जाहली यशोदा बहु खिन्न
दृश्य तें अवघें दारूण ५

———

वृंदावनांत सर्वत्र दुःखाची छाया पसरली होती. तर इकडे मथुरेंत कृष्ण येणार असं कळतांच सर्वत्र आनंदी आनंद पसरला. साऱ्याजणीं कृष्ण स्वागताची तयारी जोरानें करूं लागल्या. त्या म्हणूं लागल्या—

## १७ आज आपुल्या मथुरानगरीं देवकिनंदन येइल ग

आज आपुल्या मथुरानगरीं, देवकिनंदन येइल ग
दर्शन त्याचें घेउनि करुं या, जीवन अपुलें पावन ग १

तबक पुजेचें घेउनि हातीं, सज्ज राहुं या द्वारीं ग
पंचारति ही ओवाळुनिया, दृष्ट तयाची काढूं ग २

घराघरांवर विविध मण्यांचे तोरण सुंदर बांधा ग
सहस्त्रावधी दीप लावुनी मथुरानगरी सजवा ग ३

तऱ्हेतऱ्हेचे हार सुगंधित, विविध फुलांचे बनवा ग
कस्तुरि चंदन यदुरायाच्या भालीं आपण लावूं ग ४

वेळ नको ग, सजवा, नटवा अवघी मथुरा नगरी ग
दिन भाग्याचा, आज सुखाचा, श्यामसुंदरा पाहूं ग ५
मुरलीधर मनमोहक त्याची मंजुल मुरली ऐकूं ग
कृष्ण कन्हैया रूप बघोनी ब्रह्मानंदीं डोलूं ग ६

---

धनुर्यागाचा दिवस उजाडला. कृष्ण समारंभास हजर राहिला. कंसाची बुद्धी विपरीत झाली होती म्हणूनच कीं काय त्यानें धनुर्यागाचा समारंभ आंखला होता.

दा. क्र. 9368(५)

## १८ विनाश काले विपरित बुद्धी—

विनाश काले विपरित बुद्धी झाली कंसाची
दुर्बुद्धी जाहली तयाला प्रभुवध करण्याची ॥

कृष्ण वधाचें कार्य साधुनी घ्याया कपटानें
धनुर्याग! छे! नाटक रचिलें कंसनृपालानें
कर्मगतीसह सदैव फिरते बुद्धी मनुजाची १

सुरा प्राशुनी मत्त गजाला ठेवियले द्वारीं
पदीं तयाच्या चिरडूं हरिला, डाव असे अंतरीं
भव्य मंडपीं पखरण केली, अपुल्या हेरांची २

भालीं चंदन, कटिं पीतांबर, पुष्पहार कंठीं
हांसत हांसत बलरामासह आला जगजेठी
अशा प्रभूला बघण्या द्वारीं दाटी लोकांची ३

पिसाळला परि गज द्वारींचा कृष्णावरि धांवला
यदुरायानें हस्तें अपुल्या सहज तया रोखिला
दंत उपटुनी वाट दाविली त्याला मृत्यूची ४

रंगमंडपीं उभा राहिला जाउनि यदुनाथ
धनुष्य घेतां हातीं, उमटे ध्वनी क्षणार्धांत
कडकड् कडकड् जणूं कडाडे वीज अभाळींची ५

भय व्याकुळ तो कंस तेधवां सांगे कृष्णाला
मल्लयुद्ध कर चाणुरासवें आव्हानाचे तुजला
चाणुरासही वाट दाविली हरिनें मरणाची ६

कंस नृपाला आणिं कृष्णानें, खालीं खेंचियेलें
छाताडावर बसुनि तयाला यमसदनीं धाडिलें
दुष्ट नृपाची सत्ता सरली मथुरानगरीची ७

---

अशारीतीनें फार दिवसांचा मथुरेचा वनवास संपला सर्वत्र आनंदी आनंद झाला.

## १९ संपला मथुरेचा वनवास—

संपला मथुरेचा वनवास
कंसवधानें श्रीरंगानें सोडविला गळफांस ॥

आज सुखाची आलि पर्वणी
आनंदानें डोले धरणी
अगम्य या कृष्णाची करणी
श्रीघननीळा तुझ्याकृपें हा आज इथें उल्हास १

भीतीचा लवलेश न उरला
अमुच्यासाठीं कृष्ण धांवला
चराचरांतुनि वसंत फुलला
सहस्रावधी दीप लावुनी उजळा हो अवकाश २

गुढ्या उभारा बांधा तोरण
रांगोळ्यांनीं सजवा अंगण
परमसुखाचा आला हा क्षण
पक्वान्नाच्या उठवा पंक्ती, तृप्त करा सकलांस ३

चिवचिव करिती सान पांखरें
नांदा नाचा खुशाल सारे
स्वातंत्र्याचें सुटलें वारें
आजपासुनी सरले अवघे, दुःखाचे निःश्वास ४

उषा लाजरी प्रकट जाहली
गालिं तियेच्या चढली लाली
सौभाग्याचा तिलक कपालीं
सुरू व्हायचा येथुनि पुढती सौख्याचाचि प्रवास ५

———

या घटनेनें कंसाचा सासरा जरासंध चिडून गेला. त्यानें मथुरेवर स्वारी करण्याचें ठरविलें. आपल्यामुळें मथुरेवर हें नवें चक्र येत आहे म्हणून कृष्णानें मथुरा सोडून द्वारकेस जाण्याचें ठरविलें. त्याच्या बरोबर इतरही अनेकजण द्वारकेस जाण्यासाठीं निघाले—

## २० चला चला रे कृष्णासंगें

चला चला रे कृष्णासंगें आनंदानें जाऊं या
सभोंवतालीं सागरवेष्टित अशा प्रदेशीं जाऊं या १

हरित तृणाचा शालू वेष्टित सुंदर देशीं राहूं या
नीलवर्ण तो विशाल सागर, दर्शन त्याचें घेऊं या २

नव उत्साहें झटुनि अहर्निश द्वारकापुरी उभवूं या
शिल्पकलाकृति नयन मनोहर तटातटावर रेखूं या ३

नयनरम्य अति सुरेख रेखिव प्रासादचि ते बांधूं या
विशाल वाडे, आंखिव रस्ते, उद्यानें नव बांधूं या ४

सुवर्णनगरी बनवुनि तेथे, स्वर्गीचे सुख निर्मू या
कृष्ण आपुला होइल राजा, सुखें सकलही नांदू या ५

समृद्धीच्या नवरंगानें जीवन सारे उजळूं या
रंगमयी त्या मृदुल फुलांची रंगित रंगत पाहूं या ६

फळाफुलांचा समृद्धीचा स्वाद सुखानें घेऊं या
नंदकिशोरासवें रंगुनी नंदनवन तें उभवूं या ७

सुजलाम् सुफलाम् भूमीवरती नगर आपुलें उभवूं या
जीवनिं आणिक परमसुखाचा अनुभव मोदें घेऊं या ८

---

आपला बेत तडीस जात नाहीं हें पाहतांच जरासंधानें दुसराच बेत आंखला. त्यानें रुक्मिणीचा भाऊ रुक्मी याचें मन वळवून रुक्मिणीचा विवाह शिशुपालाशी करण्याचें ठरविलें. रुक्मिणीचें श्रीकृष्णावर प्रेम होतें हें त्याला ठाऊक होतें. त्या घटनेमुळें रुक्मिणी अस्वस्थ झाली. काय करावे हें तिला कळेना. अखेरीस तिनें एका विश्वासू ब्राह्मणाबरोबर कृष्णाकडे एक पत्र पाठविलें. त्यांत ती म्हणते—

## २१ धांव मुकुंदा झणीं

धांव रे श्यामसुंदरा धांव मुकुंदा झणीं
तुझ्याचसाठीं आजवरी रे, तळमळली रुक्मिणी १

त्रिभुवन सुंदर यदुराया रे, रूप तुझें आगळें
तुझ्यांवरी मी श्रीघननीळा मोहित रे झालें २

शक्ती बुद्धी रूपसंपदा, तुझी अलौकिक किती
रात्रंदिन मज ध्यास तुझा रे, लिहुं या पत्रीं किती ३

कुणी पारधी दिसतां जैशी, बावरते हरिणी
तशीच कृष्णा बावरली रे, आज तुझी रुक्मिणी ४

जलाविना नच मत्स्य जगतसे, वृक्षाविण वेल
कृष्णाविण हें रुक्मिणि जीवन, होइल रे फोल ५

आजवरी मी अन्य कुणाला नच वरिलें तुजविना
तुझ्याच मार्गीं लक्ष लागलें, धांव झणीं मोहना ६

गोवर्धनगिरि उचलोनीया, सकलांना रक्षिलें
काय परंतू माझ्या भालीं विधिनें रेखियलें ? ७

युक्ति सांगतें तुला सख्या रे, करितें मी धाडस
माझ्यासाठीं एकदांच हें करशिल ना साहस ? ८

गिरिजामंदिरिं दर्शनास मी जाइन रे जेधवां
रुक्मिणिला तव कृष्ण सख्या रे पळवुनि ने तेधवां ९

---

आपण श्रीकृष्णाला पत्र तर पाठवलं, पण ते त्याला आवडेल कां ? जर त्याचें माझ्यावर प्रेम नसेल तर माझ्या या वागण्याला तो उगीचच हंसेल कीं. मी असं वागायला नको होतं. मला कांहीं सुचेनासं झालं आहे. मी पुरती बावरून गेलें आहें.–

## २२ बावरलें मी बावरलें—

बावरलें मी बावरलें । मन शंकांनीं काजळलें ॥

उगिच धाडिला आपण ब्राह्मण
भलतें केलें साहस आपण

आर्य स्त्रीला हें हो दूषण
दूषिति जन सगळे १

प्रीत तयाची नसेल मजवर
हंसेल तर मज तो मुरलीधर
प्रसंग आला आतां दुर्धर
दैवाचि कां फिरलें? २

जन्मा येउनि माझ्या भाळीं
निराशाच कां असे रेखिली
इच्छा माझी विलया गेली
व्यर्थ जिणें जगलें ३

मम इच्छेला कटु फल आलें?
जन्मा येउनि काय साधिलें?
वृथा भूमिला भार जाहलें?
पुरती मी फसलें ४

मृतासारिखें जीवन जगतें
काय करूं नच कांहीं सुचतें
विकल जाहलीं अवघीं गात्रें
शांकित मी झालें ५

पण रुक्मिणीची निराशा फोल ठरली. प्रेयसीच्या हांकेला प्रियकर धांवून आला नाहीं तरच नवल! जरासंधाच्या कडेकोट बंदोबस्तांतूनही कृष्णानें रुक्मिणीला पळविण्याचें काम पार पाडलें. रुक्मिणीला आनंद झाला. सुमुहूर्त धरला गेला. आणि मग आज आपल्या कृष्णाचें लग्न होत आहे म्हणून साऱ्या द्वारकापुरींत आनंदी आनंद झाला.

## २३ आज कृष्ण यदुरायाचें लग्न द्वारकेंत

आज कृष्ण यदुरायाचें लग्न द्वारकेंत
नको उशिर पळभर आतां जाउं मंडपांत ॥

आणियलें कृष्ण सख्यानें पळवुनि प्रियेला
सहाय्यार्थ धांवुनि जाणें, उचित हें प्रभूला
धन्य धन्य रुक्मिणि तूं ग, थोर भाग्यवंत १

उभारिल्या रस्तोरस्तीं कमानी फुलांच्या
किती म्हणुनि वर्णावा तो थाट त्या स्त्रियांचा
सडे अत्तरांचे त्याचा गंध दशादिशांत २

सांवळ्याचि कृष्ण सख्याचें रूप मनोहारी
गौरवर्ण रुक्मिणि अंगीं विनयताच भारी
कृष्ण रुक्मिणिचा जोडा, दिसे शोभिवंत ३

नाचतात मयुरहि जेव्हां मेघ गर्जतात
कोकिळाही कूजन करिती, उमलतां वसंत
आज तसें आनंदाचें दृश्य द्वारकेंत ४

माळ करीं घेऊनि कृष्ण हंसत उभा गालीं
रुक्मिणीहि लज्जायुक्त चूर मनीं झाली
परस्परा वरिण्यासाठीं अधिर परि मनांत ५

मंगलाष्टकें मग गाती, विप्र ते सुरांत
वाजतांच टाळी वाजे, सनइ ती सुरांत
देव स्वर्गलोकांमधुनी फुलें उधळितात ६

———

रुक्मिणी आतां माता होणार होती. सुखद स्वप्नांची तिला अनुभूती येऊं लागली. त्या सुखस्वप्नांचें वर्णन करतांना ती म्हणते—

## २४ वाढतां उदरिं मम तेज आपुलें नाथा

वाढतां उदरिं मम तेज आपुलें नाथा
सुखविते मनाला सुखस्वप्नांची व्यथा ॥

मंजूळ बांसरी ऐकत निद्रा घ्यावी
स्वप्नांत सहज तीं चित्रें रम्य बघावीं
मम सानुल्यास मी गीतें गोड म्हणावीं
हें असेंच कांहीं मनांत येतें आतां १

पक्षीण भरविते पिलास जीवेंभावें
वात्सल्य पाहुनी मन हें वेडें व्हावें
मउमऊ फुलांच्या शय्येवरि पहुडावें
चंद्रमा दिसावा नभांत विहरत असतां २

मी स्वैरपणानें हिंडत असतां रानीं
मज येते ऐकूं कोमल लाडिक वाणी
तें मोहक हंसरें बालक दिसतें नयनीं
मी फजीत होतें त्यासि धराया जातां ३

त्या पुष्पलतांच्या हिंदोळ्यांत बसावें
त्यावरी बसोनी झोके हळुहळु घ्यावे
त्या पुष्पसुगंधीं मन हें डुंबुनि जावें
त्या योगें वाटे प्रफुल्लता मम चित्ता ४

ही पुण्यवर्धिनी विशाल सरिता धावे
नौकेंत बसुनिया स्वच्छंदें विहरावें
त्या लाटांशीं मी सहजपणें खेळावें
तो शीतल वारा पुलकित करुं दे चित्ता ५

शेवंति, मोगरा, गुलाब, चांफा, बकुळी
ही विविध सुगंधित पुष्पें रानांमधलीं
मज वाटे, जणुं ही, सान बालकें हंसरीं
हीं अशींच स्वप्नें पडती मजला नाथा ६

———

त्यानंतर कांहीं काळानें घडलेली गोष्ट. सत्राजित नांवाच्या राजाजवळ स्यमंतक नांवाचा मणी होता. त्यापासून त्यास रोज दोन भार सोनें मिळे. तो मणी आपणांस मिळावा असें वसुदेवास वाटे, त्याप्रमाणें कृष्णानें सत्राजितास विचारतांच त्यास त्यानें स्पष्ट नकार दिला. पुढें एकदां सत्राजिताच्या भावानें शिकारीस जातांना तो मणी आपणाबरोबर नेला. पण तेथें त्यांस वाघानें खाल्लें. त्याच वेळेस तेथें हजर असलेल्या जांबुवानानें तो मणी पळविला. सत्राजितास श्रीकृष्णाचा संशय आला. पण आपण मणी घेतला नसल्याचें सांगून श्रीकृष्णानें त्यांस मणी शोधून देण्याचें आश्वासन दिलें. त्याप्रमाणें

कृष्ण शोधार्थ निघाला. शोधतां शोधतां तो थेट जांबुवानाच्या गुहेंत शिरला. अचानकपणें आपल्या गुहेंत शिरलेल्या श्रीकृष्णाला पाहून जांबुवान क्रुद्ध झाला. तो त्यास रागानें म्हणूं लागला—

## २५ उद्धटा, माझें तुज आव्हान—

उद्धटा माझें तुज आव्हान
मल्लयुद्ध कर, उतरवीन तव, शक्तीचा अभिमान ॥

तारुण्याची तुजला मस्ती
तुला न संमत सज्जन रीती
यौवनांतल्या कैफापायीं होउं नको बेभान १

गुहेंत शिरसी अनुज्ञेविना
नच शोभे हें तुजला तरुणा
उघड तुवां रे, बळेंचि केला, माझा हा अपमान २

मणी स्यमंतक मिळवायाला
येणें तव रे ह्या समयाला
ज्ञात सर्व हें मजला सारें, जा मागें परतून ३

कोठें पणती, कोठें भास्कर
ओहळ कोठें, कोठें निर्झर
मंडूकास नच शक्य कदापी घेणें रे गजप्राण ४

टिटवी कां कधिं सागर अटवी
वांझ कां कधीं बाळा प्रसवी
अविचारें जर करशिल साहस होशिल रे निष्प्राण ५

विषास चाखुन पाहुं नको रे
अग्निवरी पद ठेवुं नको रे
परिणामें तव हातीं अपयश खूणगांठ ही जाण ६

---

कृष्ण जांबुवान यांचें मल्लयुद्ध झालें. पण कृष्ण पराक्रमानें जांबुवान चकित झाला. तो कृष्णाला शरण गेला. स्यमंतक मणी तर त्यानें कृष्णाला दिलाच पण आपली जांबवतीही त्यानें कृष्णास अर्पण केली. या घटनेनंतर धृतराष्ट्राकडून कृष्णाकडे एक दुःखद वार्ता आली पांडव व कुंती ज्या वाड्यांत राहात होते त्या वाड्यास एकाएकीं आग लागून त्यांतच त्यांचा अंत झाल्याची ती वार्ता होती. वसुदेवानें कृष्णामार्फत धृतराष्ट्रांस सांत्वनपर संदेश पाठविला. त्यांत ते म्हणतात—

## २६ कोसळले आकाश

कोसळलें आकाश
होउं न शकलें सार्थक धरितां कर्तव्याची कास ॥

वृद्धत्त्वें तनु झाली जर्जर
कितिक आपदा आल्या दुर्धर
प्रयत्नांत ना कसूर तिळभर
वृद्धपणीं हा दैवें दिधला आपणासि गळफांस १

होउं नये तें झालें आतां
दोषाचि देणें पूर्वसंचिता
यांहुनि कांहीं नुरलें आतां
कर्तव्यीं नित जागृत राहुनि घेतलेत सायास २

खेद मनाला लावुं नका परि
घडणारें घडणार कधींतरि
या मृत्यूची झेंप कुणावरि
येइल कैसी कोण निमित्तें, ठाउक नच कोणास ३

पूर्वजन्मिचा कोण कोठला
दोन घडीचा डाव येथला
खेळाया परि समीप आला
सरता संचित सोडुनि जातो इहलोकीचा वास ४

मानव वांछित एक मानसीं
यशास्तवें तो झटत अहर्निशिं
दैवाची कधिं होते सरशी
सुखदुःखाचा निसर्गनिर्मित नरजन्माशीं फांस ५

माया जोडी, माया तोडी
मायेची ही फसवी गोडी
रीत तियेची असे रांगडी
भगवंतावरि श्रद्धा ठेवुनि सोसा या दुःखास ६

आपण अपुलें काम करावें
सुखदुःखाशीं समरस व्हावें
प्रभुसि भजावें जीवें भावें
सत्कर्मीं नित रंगुनि जाणें हेंचि उचित मनुजास ७

———

पांडवांच्या मृत्यूबद्दल कृष्णाला मात्र शंकाच होती. त्याच वेळेस दुसरी एक घटना घडून आली. सत्राजितानें सत्यभामा कृष्णाला अर्पण केली होती. या घटनेमुळें शतधन्वा चिडून गेला. त्याचें सत्यभामेवर प्रेम होतें. या रागांत त्यानें सत्राजिताचा वध केला. या दुःखानें सत्यभामा धाय मोकलून रडूं लागली. "नाथ, माझ्या वडिलांचा वध करणाऱ्याला आपण कांहींच कां शासन करणार नाहीं ?" "सत्यभामे, शोक आंवर, तूं अगदीं निःशंक रहा, अपराध्याला योग्य तेंच शासन दिलं जाईल" असें कृष्णानें तिला आश्वासन दिलें—

## २७ निःशंक राहशी तूं

निःशंक राहशी तूं, घेईन सूड याचा
पाप्यास ना क्षमा; मी घेईन प्राण त्याचा १

सत्राजितांस वधिलें, अपमान हा कुणाचा ?
जामात मी जयाचा, अपमान हाचि त्याचा २

शतधन्वि तो असूं दे, अथवा पराक्रमीही
नचिास क्षम्यता ना, देणें जगीं कधींही ३

कामांध पापि बनुनी, वधितोची सज्जनास
ऐशा नरास जगतीं, थारा न राहण्यास ४

जे जे कुणी तयाच्या, साह्यार्थ धांवतील
ओल्यासवें सुकेंही होईल मातिमोल ५

दिधलाचि शब्द तुजला, हा वज्रलेप जाण
पूर्तीविना न शांती, माझ्या मनास जाण ६

———

कृष्णानें शतधन्वीचा वध करून सत्यभामेला दिलेल्या आश्वासनाची पूर्ती केली. त्यानंतर नरकासुरानें देवीमाता अदितीचीं कवचकुंडलें हरण केल्यानें तीं परत मिळविण्यासाठीं इंद्र कृष्णाकडे मदतीची याचना करण्यासाठीं आला. कृष्णानें नरकासुरास ठार मारलें. त्यामुळें त्याच्या बंदिवासांत असलेल्या हजारों स्त्रियांची आपोआपच मुक्तता झाली. त्या स्त्रियांना अतोनात आनंद झाला. त्यांनीं आपल्या सुटकेबद्दल कृष्णाला धन्यवाद दिले. परंतु आपल्या स्वातंत्र्याचें सुख त्यांना सुखानें भोगतां येईना. कारण ह्या साऱ्या कलंकिता आहेत, अशा दृष्टीनें समाज त्यांच्याकडे पाहूं लागला. त्यामुळें अतिशय बेचैन झालेल्या त्या स्त्रियांनीं कृष्णाकडे धांव घेतली. त्या कृष्णास म्हणतात—

## २८ कर अमुचा स्वीकार—

कर अमुचा स्वीकार
तुझ्या कृपेविण कोणि न आम्हा जगतीं या आधार ॥

दुष्ट नराधम नरकासूरा
धाडिलेंसि तूं नरकीं असुरा
शासन करुनी त्यासि यदुवरा
सहस्त्रावधी युवतींवर तव अनंत रे उपकार १

शुभ घटिका ही तूंच निर्मिली
व्याघ्रमुखांतुनि सुटका झाली
कामांधाची भीती नुरली
तुझ्यामुळें प्रभु अन्यायाचा घडलासे संहार २

स्वतंत्रतेचे दिन सौख्याचे
येतिल पुढती प्रफुल्लतेचे
चित्र उद्याचें मानसिं नाचे
मधुस्वप्नांनीं बहरुनि गेलें चित्त आमुचें फार ३

परी नशिबीं सौख्यच नव्हतें
घडावयाचें होतें भलतें
पटल सभोंती संशयतेचें
" कलंकिता ह्या " दूषण ऐसें जीव करी बेजार ४

चंद्र, सूर्य हे साक्षि अम्हाला
अम्ही राखिले अमुच्या शीला
वृथा दूषिती लोक अम्हाला
स्फटिकासम जरि शील आमुचें आज पुढें अंधार ५

तुझ्याच हातीं जगणें-मरणें
शरण आलिया आश्रय देणें
या ब्रीदासी तुला जागणें
करशिल जर अव्हेर आमुचा उडेल हाहाःकार ६

———

कृष्णानें त्या युवतींचा स्वीकार करुन त्यांना धन्य केलें. त्यानंतर कांहीं काळानें घडलेली गोष्ट. द्रुपद राजानें द्रौपदीचें स्वयंवर करण्याचें ठरविलें. त्यासाठीं अनेकांना निमंत्रणें गेलीं. पांडवही तेथे येतीलच या खात्रीनें कृष्णही तेथें हजर राहिला. असंख्य राजे जमा झाले. भव्य मंडप विविध देशींच्या राजांनीं फुलून गेला—

## २९ स्वयंवर आज द्रौपदीचें—

वीर धुरंधर नृपाल जमले देशोदेशींचे
स्वयंवर आज द्रौपदीचें ।

द्रुपद नृपाचा सुमंत सांगे विनवुनियां सकलां
स्वयंवरास्तव खास एक " पण " द्रुपदें योजियला

करिल द्रौपदी मोदें स्वागत विजयी वीरांचें
स्वयंवर आज द्रौपदीचें १

पहा फिरतसे गरगर वरती मत्स्य छताखालीं
बिंब तयाचें दिसतें आहे कुंभांतिल सलिलीं
नेत्रा विंधा पाहुनि बिंबा फिरत्या मत्स्याचें
स्वयंवर आज द्रौपदीचें २

सहज साध्य हें, जिंकू आपण वाटे कितिकांसी
अमृत घटिका भवितव्याची येई उदयासी
दिसूं लागलें स्वप्न तयांना अपुल्या विजयाचें
स्वयंवर आज द्रौपदीचें ३

वीरश्रीची कीर्त जयांची नृपाधीश सगळे
यत्नें ठरतां विफल, मानसीं खिन्न बहू झाले
शंका येई भाग्य असे हें कोण्या युवकाचें
स्वयंवर आज द्रौपदीचें ४

वीरश्रीचें तेज जणूं कां सारें मावळलें ?
क्षत्रिय सारे तेहि आजला दुर्बल कां ठरले ?
विषण्णतेनें उदास झाले मानस सकलांचें—
स्वयंवर आज द्रौपदीचें ५

विप्रजनांतिल तरुण तेधवां एक पुढें आला
कुत्सित भावें हांसुं लागले नृपाल युवकाला
काय दिवटिनें हातिं धरावे तेजचि सूर्याचें
स्वयंवर आज द्रौपदीचें ६

वाण सोडूनी, मत्स्यनेत्रपरि युवकें फोडियला
जयजयकारें अवघा मंडप हर्षानें फुलला
पार्थ-द्रौपदी यांचे जडलें नातें जन्माचें
स्वयंवर झालें थाटाचें ७

---

लग्नानंतर द्रौपदीसह पांडव मातेकडे गेले. ते आपल्या मातेस म्हणाले— " आई, आम्हीं बघ आज काय आणलंय् तें ! " " बाळांनो, जें काय आणलं असेल तें पाचांनीं सारखं वाटून घ्या. " मातेचे हे उद्गार पांडवांनीं शिरसावंद्य मानले. द्रौपदी पाचांची म्हणजेच पांच पांडवांची पत्नी झाली. त्यानंतर पांडवांनीं स्वतःवर एक बंधन घालून घेतलें. ज्या भावाकडे द्रौपदी राहात असेल त्या भावाकडे तीं दोघें एकांतांत असतांना कोणीही जातां कामा नये. पण एका विप्राच्या तांतडीच्या कामासाठीं अर्जुनाला अशा प्रसंगीं धर्मराजाकडे जाणें भाग पडलें. ठरलेला संकेत मोडला गेला म्हणून अर्जुनानें १० वर्षें तीर्थाटनास जावें असें ठरलें. त्याप्रमाणें फिरत फिरत अर्जुन द्वारकेस कृष्णाकडे आला. तेथें त्यानें प्रथमच रैवतेक पर्वतावर सुभद्रेस पाहिलें. तिच्या रूपानें तो मोहित झाला. तो म्हणूं लागला—

## ३० रैवतेक पर्वतिं मी पाहिले तुला—

रैवतेक पर्वतिं मी पाहिलें तुला
अनुपम तव सौंदर्यें जिंकिले मला १

रूपसंपदाच अशी कधिं न पाहिली
अंतरांत गोड ओढ, आज लागली २

गौरवर्ण तव कांती रूप आगळें
मंद मंद चाल; तसें हास्य मोकळें ३

विपुल तुझ्या कुंतलि गे हांसरीं फुलें
पुष्पांचें जीवन त्या धन्य जाहलें ४

तनु लतिका तव कोमल खुलवि यौवन
गालींचा तीळ तोहि हंसत लाजुन ५

किण किण रव कर कंकण करित मंजुल
खुलवितात सहज तुझे करहि कोमल ६

रेखियले विधिनें तव रूप आगळें
प्राहतांच मदनशरें चित्त तळमळे ७

बावरली मम वृत्ती, मनहि बावरे
रोमांचें पुलकित तनु, बघहि थरथरे ८

एक ध्यास, एक आस मजसि अंतरीं
जीवनांत तुजविण गे, काय माधुरी ९

---

अर्जुनाची ही स्थिती कृष्णानें ओळखली. कृष्णाच्या मनांतूनही सुभद्रा अर्जुनासच द्यावी असें होतें. त्याप्रमाणें सुभद्रेस पळवून नेण्याचा सल्ला श्रीकृष्णानें अर्जुनास दिला. याप्रमाणें अर्जुनानें सुभद्रेस पळवून नेलें. पुढें पांडवांनीं कृष्णाच्या सल्ल्यानुसार अनेक आपत्तींना तोंड देत देत अनेक विजय मिळविले. तेव्हां पांडवांनीं आतां राजसूय यज्ञ करावा असें नारदांनीं पांडवांना सुचविलें. याही बाबतींत पांडवांनीं श्रीकृष्णाचा सल्ला विचारला तेव्हां कृष्ण त्यांना म्हणाला—

## ३१ राजसूय यज्ञासी वेळ योग्य ना—

जरासंध यमसदनीं धाडिल्याविना
राजसूय यज्ञासी वेळ योग्य ना ॥

परपीडक पापात्मा
ऐसा तो दुष्टात्मा
होऊनियां मत्त वहुत छेडितो जना १

मीच सर्व शक्तिशालि
धुंदि अशी त्यासि चढली
दुर्वलासि जिंकुनि हा देत यातना २

राजसूय यज्ञातें
आणिल हा विघ्नातें
ह्यासाठीं वध त्याचा प्राप्त ह्या क्षणां ३

ऐशा या दुष्टासी
पाठविणें नरकासी
सज्जन ते रक्षिणेचि, वधुनि दुर्जना ४

दुष्टांचें निर्दालन
पुण्यकर्म हेंचि जाण
क्षात्रधर्म पालन हें योग्य आपणां ५

विघ्न वन्हि हा दाहक
मार्गातिल हा कंटक
दुरि करणें ह्याविना न मार्ग आपणां ६

———

भीमाच्या साहाय्यानें कृष्णानें जरासंधाला मल्लयुद्धांत ठार केलें. त्यानंतर राजसूय यज्ञसोहळा मोठ्या थाटांत पार पडला. विविध देशींचे राजे जमा झाले होते. यज्ञ-समाप्तीपूर्वी श्रेष्ठ राजांची पूजा करण्याचा प्रसंग उद्भवला. या पूजेचा सर्व प्रथम मान कोणास द्यावा यावरून कौरव-पांडव यांत वादविवाद सुरू झाला. श्रीकृष्णाला हा मान देण्याला कौरवांचा कसून विरोध होता. तर श्रीकृष्णच अग्रपूजेस्तव योग्य आहे हें सांगतांना पांडव म्हणाले :—

## ३२ प्रभु प्रेमाविण दुर्बल मानव

प्रभु प्रेमाविण दुर्बल मानव
सकलांचा प्रभु हा तर माधव ॥

जया कृपें ही यज्ञ सांगता
त्या कृष्णावर अमुची ममता
कृपा अम्हांवरि त्याची असतां
विघ्नांचा नच मुळिही संभव १

पराक्रमी हे वीर येथले
मान्य अम्हांला आहे सगळे
या सर्वांहुनि परी आगळें
सामर्थ्यें हा शोभे माधव २

'नृपाल आम्ही उच्च कुलांतिल
हा तर गवळी हीन कुलांतिल'
अशी भावना कार्या नाशिल
सत्प्रेमें परि वंदा केशव २

वधिलें यानें कंस नृपाला
लोळविलें अन् कालीयाला
गोवर्धनगिरि सहज उचलिला
उगिच कशाला करिता तांडव ३

वृद्ध जाणते भीष्महि जेथें
या कृष्णाला मानिति मोठे
कां मन तुमचें शंकित होतें
करावयाला हरिचा गौरव ४

शासन करण्या अन्यायाला
प्रकाश द्याया या जगताला
तेजो भास्कर हा अवतरला
त्रिभुवन सुंदर कृष्णदयार्णव ५

कृष्ण नसे तर विजय कोठला
कृष्णाविण नच तेज कुणाला
कृष्णाचि कारण चैतन्याला
कृष्ण आमुचे आहे वैभव ६

अम्हास शंका नच लवलाही
प्रभुप्रेमाविण मूर्त न कांहीं
मानस अमुचें देतें ग्वाही
अग्रपुजेस्तव योग्याचि माधव ७

---

अखेरीस शिशुपालाचा वध करूनच श्रीकृष्णास या वादंगाचा शेवट करावा लागला. त्यानंतर कौरवांनीं पांडवांना द्यूत खेळण्याचें आव्हान दिलें. दिलेलें आव्हान क्षत्रियांनी नाकारूं नये या सबबीवर पांडवांनीं तें स्वीकारलें. पांडव हरले आणि अखेरीस त्यांनीं द्रौपदीसहि "पणा'स लावलें! हाय! शेवटचा फांसाहि पांडवांच्या विरुद्धच पडला. या संधीचा फायदा घेऊन दुर्यो-

धनानें द्रौपदीला राजसभेंत असेल त्या स्थितींत खेंचून आणण्यास सांगितलें. भर राजसभेंत द्रौपदी वस्त्रहरणाची लज्जास्पद घटना घडूं लागली. द्रौपदीचें सारें धैर्य खचलें. देवा, माझ्या अब्रूची होळी होण्याची वेळ आली मी आतां कुणाचा धांवा करूं ? यावेळीं मला कोणीच का त्राता नाहीं अशा आक्रोशांनीं ती ओरडूं लागली—

## ३३ त्राता न मज का कुणी !

त्राता न मज का कुणी
वीर पत्नि मज स्पर्शिति कैसे कामांधाचे हात
या भगिनीला, स्त्री जातीला, मान नुरे जगतांत
मजला वांचव रे यदुनाथ ॥

दुःशासन हा ऐकत नोहे
रजःस्वला मी तशांत आहे
एक वस्त्र मम अंगीं आहे
बळेंचि मजला ओढित नेतो, काय असे दैवांत ? १

प्रबल पराक्रमि ज्यांची कीर्ती
पति हे माझे माझ्यापुढती
विटंबना कां माझी बघती
आज अचानक कैसे बनले दुर्बल त्यांचे हात २

सहस्त्रावधी वर वीराग्रणि
फजिती माझी उघड्या नयनीं
बघती कैसे स्तब्ध राहुनी
वीरश्री कां मेली तुमची, मर्त्यचि कां झालांत ३

साद घालुं का त्या कृष्णासी
दिलेचि ज्यानें मज वचनासी
" धांवुनि येईन हांकेसरसी "
वेडी माझी ठरो न आशा, धांवसख्या यदुनाथ ४

धांव मुकुंदा, धांव श्यामला
वांचव वांचव तव भागिनीला
" शरण येई जो अभय तयाला
देईन " ऐसें तव आश्वासन धांव झणीं श्रीकांत
मजला वांचव रे यदुनाथ ५

---

द्रौपदीच्या हांकेला कृष्ण धांवून आला. आणि द्रौपदीची अब्रु राखली गेली. इकडे कुचैल ग्रामीं सुदामा नामक कृष्णाचा गुरुगृहीचा मित्र राहात असे. तो अतिशय गरीब स्थितींत दिवस कंठीत होता. परंतु त्याची कृष्णावर अतिशय भक्ति होती. ही कृष्णभक्ति सुदाम्याच्या पत्नीला आवडत नसे. ती म्हणे— " तुमचा तो कृष्ण तिकडे राजवाड्यांत राहून राजवैभव भोगीत आहे आणि इकडे तुमच्या घरीं मात्र अठरा विश्वें दारिद्य ! एवढं कृष्णप्रेम असेल तर एकदां त्याला जाऊन भेटून तरी या. पडल्या फळाची आज्ञा म्हणून सुदामा कृष्णाकडे जाण्यास निघाला.

## ३४ सुदामजी चालले

पोट पाठिला, देह सांपळा, सुदामजी चालले
पुरुषोत्तम घननीळ दर्शनीं, उत्सुक मनिं झाले १

जीर्ण मलिन तें वस्त्र कटीला, पंचा खांद्यावरी
मुठभर पोहे त्यांत बांधिले, कृष्णप्रेम अंतरीं २

सुशील पत्नी दारिद्र्यानें, होती गांजियली
म्हणे पतीला कशास गातां, कृष्णसखा थोरवी ३

भेटा त्याला एकदां तरी कळेल हृद्गत तरी
गुणगौरवपर नको तयाचे कीर्तन ते तोंवरी ४

वैभव बघतां द्वारकेतले पुरता भांबावला
शंका आली कृष्णप्रभू तरि ओळखील का मला? ५

रत्नविभूषित राजआसनीं कृष्ण जसा देखिला
भक्तिभाव मनिं जागृत होउनि कंठ मुदें दाटला ६

सुदामजीला पाहतांच क्षणिं सोडुनिया आसना
धांवत येउनि कृष्णप्रभूनें दिधलें आलिंगना ७

'फार दिसांनी भेट जाहली, सर्व कुशल क्षेम ना?
माझ्यासाठीं काय धाडिले वहिनींनी सांग ना' ८

स्तब्ध पाहुनी सुदामजीला, कृष्ण मनीं हांसला
स्वकरें घेउनि पंचा त्याचा उघडुनिया पाहिला ९

पोहे बघुनी सहज टाकिला घांस मुखीं त्याचा
"पोहे नच मज पक्वान्नाचा स्वाद गमे साचा १०

मित्रा, तव हें प्रेम पाहुनि तुष्टलोच मी मनीं
सांग सुदामा काय हवे तुज" नकोच चिंता मनीं ११

संकोचें मग उत्तर दिधले-"कांहिं नको रे मला
किती दिसांची इच्छा होती, भेटावे तुजला" १२

निरोप घेउनि कृष्णसख्याचा परते माघारी
स्वागत करण्या प्रेमळ पत्नी आली सामोरी १३

दैन्य लोपुनि वैभव माझ्या सदनीं आले कसे ?
नवल वाटते काय पाहतो ? स्वप्नीं मी तर नसे ? १४

पृच्छा करितां हांसत वदली " पुरोचि थट्टा गडे "
कृष्णानें तर धाडियले हे वैभव मित्राकडे १५

---

कृष्णानें आपल्या मित्राच्या घरची परिस्थिति अशा रीतीनें एकदम बदलून टाकली. तर इकडे पांडव अज्ञातवासांतून एक वर्ष अगोदर प्रगट झाले असा मुद्दा उपस्थित करून कौरवांनीं पांडवांशीं भांडण सुरू केलें. अखेर प्रकरण हातघाईवर आलें. आणि युद्धाचा प्रसंग उद्भवणार असा रंग दिसूं लागला. तेव्हां तसा प्रसंग टळावा म्हणून कृष्ण शिष्टाईसाठीं हस्तिनापूरास गेला. त्यानें धृतराष्ट्रास परोपरींनें सांगितलें—

## ३५ करुं या समझोता

करुं या समझोता
सकल जनांच्या हितार्थ कथितो युद्ध नको आतां ।

धृतराष्ट्रा मी कथित आपणा
प्रेमानें आजि मिटवुं भांडणा
उगीच कशाला समर घोषणा
संघर्षानें प्रेम लोपुनी वाढतसे कटुता १

दुःख सदोदित हंसत सोसणें
असे जयांचे नित्य वागणें
न्याय नीति हें ज्यांचे लेणें
निर्मल ज्यांचे जीवन त्यांना व्यर्थचि कां छळतां २

सीमा नुरली अपमानाला
फुटते वाचा अन्यायाला
ठाउक आहे सत्य तुम्हाला
परिणामीं मग अनर्थ होइल, सावध व्हा आतां ३

हा दुर्योधन पुत्र आपला
कपटी, निर्दय, अंतरिं काळा
कारण केवळ या विघ्नाला
तात ! म्हणोनी असे विनंती आंवरुनि घे पुत्रां ४

फेडि वस्त्र हा पतिव्रतेचें
पांडव पत्नी पांचालीचें
हरण कराया तिच्या शिलाचें
नीच नराधम दुष्टानें या दाखविली हीनता ५

इतुके झाले तरिही अंती
ढळूं दिली ना ज्यांनी शांती
अंगि असोनी साहस वृत्ती
त्या पुत्रांना, कुंति सुतांना दाखवाचि ममता ६

निरोप त्यांचा आलो घेउनि
नको राज्य वा वैभव त्याहुनि
पांचचि गावें द्यावीं लावुनि
सांगण्यास हें आलों येथें, मनांत उत्सुकता ७

युद्ध समर क्षण टाळायाला
पुरे करावे या इच्छेला
योग्य तोड ही या समयाला
अहंपणाचा ताठा सोडा, कराचि समझोता ८

---

परंतु कृष्णशिष्टाई सफल झाली नाहीं. पांचच गांवें काय पण सुईच्या अग्राएवढी माती देण्यास सुद्धां कौरव तयार झाले नाहींत. अखेर युद्ध अटळ झालें. कौरव पांडव युद्धासाठीं समोरासमोर उभे राहिले. इतक्यांत आपल्या समोरील असंख्य नातलगांना पाहून अर्जुन खिन्न झाला. एवढ्या नातलगांना ठार मारून मी काय मिळविणार आहे बरें ? त्यापेक्षां नकोच हें युद्ध अशा विचारांनी त्याचें मन विचलित झालें. अर्जुनाची ही नैराश्यता पाहून कृष्णानें त्यास योग्य असा उपदेश केला तो उपदेश म्हणजेच गिता. कृष्ण पार्थास म्हणाला—

## ३६ देह तर मातीचा गोळा

देह तर मातीचा गोळा
शाश्वत आत्मा, नाशवंत कुडि, ठावें कां न तुला ?

शोक कुणास्तव करिशी पार्था
घडणारे घडणार सर्वथा
व्यर्थ वाहशी कां मनिं चिंता
दुर्बलता ही ह्या समयाला उचित नव्हे तुजला १

विसरुनि अपुल्या क्षत्रिय धर्मा
दोष लाविशी अपुल्या कर्मा
चंचल वृत्ती नच ये कामा
मृत्युसंगरी येतां होशिल, सुपात्र मोक्षाला २

अथवा मृत्यू नच ये संगरिं
मिळविशील तरि राज्य भूवरी
नैराश्याला सोड झडकरी
चापबाण हा घेउनि हातीं, जागवि धर्माला ३

जन्मा आला जो जो प्राणी
असो सद्‌गुणी अथवा दुर्गुणी
मरणांतुनि नच सुटला कोणी
अमरपणाचा पट्टा प्रभुनें कोणा नच दिधला ४

धर्माला ये जेव्हां ग्लानी
अधर्म माजे जेव्हां अवनीं
प्रकृतिचा मग आश्रय करुनी
अधर्मनाशास्तवें भूवरीं अवतरणें मजला ५

कर्मफलाची आस त्यजावी
कर्तव्याची कास धरावी
श्रद्धा मानसिं नित्य वसावी
श्रद्धायुक्तें जे भजती ते भक्तचि प्रिय मजला ६

जें जें जगतीं सत्य नि सुंदर
मीच नांदतों तिथें निरंतर
श्रद्धा ठेविशि मम शब्दांवर
सुखदुःखाशीं ईशचकारक, तारिल तो सकलां ७

---

कौरव-पांडव युद्ध सुरू झालें. भीष्मांच्या पराक्रमापुढें पांडव हतबल झाले. अर्जुनाचा धीर सुटूं लागला. इकडे दुर्योधनानें "अजून पांडव मारले जात नाहींत" असें म्हणून भीष्ममुनींची कुत्सितपणें हेटाळणी करण्यास सुरुवात केली. त्यामुळें चिडून "उद्यां एकतर पांडव तरी कामीं येतील किंवा

हा भीष्म तरी या युद्धांत मारला जाईल" अशी प्रतिज्ञा भीष्मांनीं केली. अखेर कृष्णानें एक कपट योजिलें. या कामीं त्यानें द्रौपदीचें साहाय्य घेण्याचें ठरविलें.

## ३७ सांगतों आज तुला श्रीहरी

मार्ग यशाचा धरी
सांगतो आज तुला श्रीहरी

ऐक द्रौपदी तुजला कथितों
हितकारक तें तुला सांगतों
मार्ग हाचि यशदायी गमतो
भार अतां तुजवरी १

रात्रींच्या या भयाण तिमिरीं
जाणें तुजला भीष्म शिबिरीं
असतां मग्नहि ईशाचिंतनीं
चरण तयांचे धरी २

नमस्कार परि करतांनाही
नुसते वाजिव करकंकणही
नकोस बोलूं शब्द एकही
म्हणतिल कांहीं जरी ३

"अखंड लाभो सौभाग्याला"
आशिर्वच हा देतिल तुजला
विजय आपुला निश्चित झाला
जाण सखे अंतरीं ४

आशिर्वच हा मिळतां तुजशि
"हाऽऽय" म्हणोनी थांब जराशी

उघडुनि नयनां बघतिल तुजसी
भीष्ममुनी नंतरीं ५

" आशिर्वच मुनि दिलात मजला
मानुं कसा मी खरा तयाला "
बोलुनि ऐसें, संशय अपुला
प्रगट तेधवां करी ६

---

या गोष्टीचा इष्ट तोच परिणाम झाला. शिखंडीच्या आडून भीष्मांवर केलेल्या अविरत बाणांच्या वर्षावामुळें भीष्म पितामह रणांगणावर धाडकन् कोसळून पडले. अर्थात सैन्याचे सूत्रधार म्हणून कोणास नेमावें याबद्दल दुर्योधनापुढें पेंच उभा राहिला. अखेरीस कर्णाकडे सर्वाधिकार द्यावेत असें त्यांस वाटलें. परंतु कर्ण विजयी होईल किंवा नाहीं याबद्दल त्याचें मन साशंकच होतें त्यावेळेस दुर्योधनास आश्वासन देतांना कर्ण दुर्योधनास म्हणाला—

## ३७ सांगतों तुला नृपा

सांगतों तुला नृपा, करिन वचन पूर्तता
विजयाविण मम चित्ता, लाभणें न शांतता ॥ धृ ॥

लोळविन पांडवांस, किन्तु नच मुळिं मला
निश्चयेंचि या रणीं, विजय होय आपुला
विजयाचा ध्यास एक, त्याविणें न स्वस्थता
सांगतों तुला नृपा, करिन वचन पूर्तता १

जेथवरि कर्ण हाचि, प्राणपणें झुंजतो
तेथवरि विजय नृपा, कुणासहि न शक्य तो
चित्त होय संतप्तहि, तूंच सर्व जाणता
सांगतों तुला नृपा, करिन वचन पूर्तता २

संग्र. ९३८ दा. क्र. शाखा ३

अर्जुनास या रणीं, मृत्युलोक दावितों
सत्य तेच आजला, कर्ण तुला सांगतों
कर्ण आज झाला रे, वन्ही वध पेटतां
सांगतों तुला नृपा, करिन वचन पूर्तता

---

कर्ण क्रोधानें लढत असतांनाच त्याच्या रथाचें चाक भूमीनें गिळीलें. तो तें काढूं लागला. ही वेळ योग्य आहे हें जाणून कृष्णानें अर्जुनाला कर्णावर बाणाचा वर्षाव करण्यास सांगितलें. अर्जुनानें सोडलेल्या बाणांच्या वर्षावानें कर्ण मृत्यु पावला. अखेरीस एकटा दुर्योधन तेवढा शिल्लक राहिला. पांडवांनीं त्याला गदायुद्धाचें आव्हान दिलें आणि मग भीमानें त्याच्या मांडीवर गदेचा प्रहार करून त्यास यमसदनीं पाठविलें. अशा रीतीनें कौरवांचा निःपात झाला. आपल्या शंभर पुत्रांचा मृत्यु पाहण्याचें दुर्भाग्य आपणांवर ह्या कृष्णामुळेंच ओढवलें हें पाहून त्या पुत्रवियोगानें विव्हळ झालेल्या गांधारीनें कृष्णाला शापित केलें. ती त्यास म्हणते—

## ३८ शापिते गांधारी तुजला—

शापिते गांधारी तुजला
तुझ्यामुळें मी आहें भोगित दारुण दुःखाला ॥

तुझ्यामुळें हा घडला संगर
मुकलें मी मम पुत्रां शंभर
वृद्धपणीं हें दुःख भयंकर
जाळित चित्ताला १

मातृत्वाचें सरलें सौख्यहि
सरल्या इच्छा आकांक्षाही
उठती खाया दाहि दिशाही
असह्य ही लीला २

आशेचे मम दीप निमाले
नैराश्याचें पटल दाटलें
गात्रांतिल ह्या त्राण संपलें
अर्थ न जगण्याला ३

आई झाले शत पुत्रांची
दुर्दैवी मी गतजन्मींची
ही किंकाळी ह्या विधवांची
जाळित हृदयाला ४

अंधपणाचा भोग भोगितां
कुलक्षयाला बघते आतां
जन्मा येउनि काय लभ्यता
भारचि भूमिला ५

अपराधी मी मुळींच नसतां
दुखविलेंस तूं माझ्या चित्ता
सूडानें मी करिते आतां
शापित रे तुजला ६

असेंचि पुढती संगर होउनि
तुझ्या कुलाचा नाश घडोनी
रडतिल आर्या धाय मोकलुनि
कथितें मी तुजला ७

विश्रांतीस्तव बसशिल क्षणभर
तव पायींचा तळवा सुंदर
बघुनी मारिल बाणहि वनचर
मुकशिल प्राणाला ८

———

गांधारीचा शाप खरा ठरला आणि कृष्णरूपी देहाची पार्थिव ज्योत अनंतात विलीन झाली.

## तेजोरवि मावळला—

दिपवुनिया विश्वाला
तेजोरवि मावळला ॥
दुष्टांचें निर्दालन
धर्माचें करि रक्षण
ताराया सकल सुजन
जगतीं जो अवतरला १

अमर ग्रंथ 'श्रीगीता'
सांगितला सकल हिता
आचरण्या सुलभ असा
कर्मयोग शिकवीला २

श्रद्धेचा धवल मार्ग
सुगम तसा अति यथार्थ
आचरुनी व्हा कृतार्थ
सांगितलें जगताला ३

भक्तीनें मज भजती
मजला ते आवडती
मोक्षाची त्यांसि प्राप्ति
कृष्णवचन मनुजाला ४

सतत गाउं कृष्णगान
विसरुनिया देहभान
एक ध्यास, एक भजन
"कृष्ण कृष्ण गोपाळा" ५

॥ समाप्त ॥

# स्वयंसिद्धा

## ( साहित्य-रस स्पर्धा वैशिष्ट्यें व भरीव कार्य )

उभ्या महाराष्ट्रांतील पहिलीच कौशल्यपूर्ण शब्द-स्पर्धा म्हणून साहित्य-रस स्पर्धेचा उल्लेख प्रामुख्यानें करावा लागेल. तिलाच अग्रपूजेचा हक्क द्यावा लागेल. एक नाहीं दोन नाहीं, सतत **सहा वर्षे** तिनें महाराष्ट्रांतील घरांघरांत अधिराज्य गाजविलें आहे. रसिकांच्या मनांत स्वतःचें असें एक वैशिष्ट्यपूर्ण स्थान निर्माण केलें आहे. आपल्या भव्यतेनें नि नवनवोन्मेशशालीनतेनें सर्वांचें लक्ष वेधून घेतलें आहे. एकामागोमाग एक अशा बौद्धिक व आगळ्याच स्पर्धा सादर करून शतक सोहळा तर साजरा केलाच, पण अलिकडेच **सव्वाशतक** सुद्धां पूर्ण केलें आहे.

ह्या सहा वर्षांच्या कालावधींत साहित्य-रस स्पर्धेला असामान्य लोकमान्यता प्राप्त झाली आहे आणि ह्याची परतफेड म्हणून ह्या सहा वर्षांत एकूण **३८ लाखांचीं** बक्षिसें साहित्य-रस स्पर्धेनें वांटलीं.

शब्दस्पर्धांत मोठ्या रकमा जाहीर करणें अतिशय सोपें असतें, पण त्या पुरेपूर स्पर्धकांच्या पदरांत टाकणें ही मात्र एक कसोटी असते. पण स्पर्धकांचा **अलोट विश्वास** हें तर रस-स्पर्धेचें मानचिन्ह आहे. आणि रसिकांच्या ह्या विश्वासास आपण पुरेपूर पात्र असल्याची ग्वाही क्र. १२५ ह्या स्पर्धेनें दिली आहे. ह्या वैशिष्ट्यपूर्ण स्पर्धेंत **सर्वांत मोठी** रक्कम म्हणजे १,२५,००० बक्षिसासाठीं दिली गेली. रु. १ लाखाचीं बक्षिसें **चार वेळां** वांटण्यांत आलीं.

साहित्य-रस स्पर्धा महाराष्ट्रीयांच्या आदराला, विश्वासाला आणि प्रेमाला पात्र होण्याचें प्रमुख कारण म्हणजे तिची विधानांची चोखंदळता. विधानें **संपूर्ण** व **स्वयंपूर्ण** असल्यामुळें स्पर्धकांना साहित्य-रस स्पर्धेंत भाग घेणें ही एक आनंदाची आणि विशुद्ध मनोरंजनाची पर्वणीच वाटते.

लोकविश्वास मिळविण्यासाठीं साहित्य-रस स्पर्धेनें सहा वर्षें अतोनात श्रम केले आहेत. कारण असा भक्कम विश्वास मिळविणें हें कांहीं एकदोन दिवसाचें काम नसतेंच. पण साहित्य-रस स्पर्धेची कार्यपद्धति इतकी **निर्दोष** व **चोख** आहे

कीं, असा विश्वास सहज निर्माण व्हावा. बक्षिसें वेळच्या वेळीं आणि बिनतक्रार रवाना करण्याची साहित्य-रस स्पर्धेची कार्यक्षमता अत्यंत उच्च प्रतीची ठरते.

ह्याच स्पर्धेंत मोठें बक्षीस जिंकण्याचाहि विक्रम प्रस्थापित झाला आहे. बिनचुकीचें बक्षीस म्हणून रु. १७,००० एकाच स्पर्धकाच्या वांट्यास आलें.

ह्या तर कार्यांतील नेहमींच्या गोष्टी झाल्यात. पण स्पर्धकांच्या आणि रसिकांच्या वाङ्मयाच्या अभिजात आवडीचें संगोपन करण्याची महत्त्वाची कामगिरी साहित्य-रस स्पर्धा पार पाडीत आहे. अत्यंत अल्प अशा किंमतींत उच्च साहित्याची पाणपोई घालणारें साप्ताहिक 'साहित्य-स्वप्न' हें त्याच कार्याचें आजपर्यंत प्रतीक आहे.

स्पर्धकांना साहित्य-रस स्पर्धेची आठवण सदैव राहावी म्हणून आतांपर्यंत संसारोपयोगी अशा रु. १,१०,००० किंमतीच्या वस्तु सप्रेम भेट म्हणून दिल्या गेल्यात. स्पर्धा जगतांत खळबळ उडवून देणाऱ्या आणि सर्व तऱ्हेच्या स्पर्धकांकडून मोठ्या प्रमाणांत मागणी असलेल्या चार विधान स्पर्धांची ओळख साहित्य-रस स्पर्धेनेंच करून दिली आहे.

साहित्य-रस स्पर्धेनें वरील सर्व वैशिष्ट्यांमुळें स्वतःचें वेगळेंपण तर निर्माण केलेंच, पण त्याला टिकाऊपणा देणाऱ्या भरीव कार्यांनाहि गतिप्रवण केलें आहे. ह्या स्पर्धेनें महाराष्ट्रांत जें भरीव कार्य केलें आहे तें अनेकविध व अनेक पदरीं असें आहे.

स्पर्धकांच्या वाचनास धार देणारें साहित्य नेहमींच हाताशीं असावें म्हणून १५,००० रु. चीं पुस्तकें तिनें आजपर्यंत वांटलीं आहेत. आयुष्यांत सुद्धां प्रत्येकाला कांहींतरी नवीन घडावें असें वाटतें. हा मनुष्यस्वभावच आहे. हें स्मरून नवनवीन आकर्षणें देण्याची प्रथा साहित्य-रस स्पर्धेनें सुरू केली आहे.

आजचे नवोदित हेंच उद्यांचे प्रथितयश होत हें साहित्य-रस स्पर्धेनें मनोमन ओळखलें आहे आणि म्हणूनच तर नवोदित लेखकांना २,००० रु. चा पुरस्कार वांटून त्यांना प्रोत्साहन दिलें आहे. ह्या अंगाप्रमाणेंच क्रीडाक्षेत्राकडेहि साहित्य-रस स्पर्धेनें लक्ष देऊन तेथें एक ढाल ठेवली आहे.

महाराष्ट्रावर आलेली पुराची आपत्ति ही एक अविस्मरणीय घटना आहे. अशा वेळीं पुरग्रस्तांना सढळ हातानें साहित्य-रस स्पर्धेनें मदत केली आणि आतां तर शत्रूच्या निर्घृण आक्रमणामुळें सगळा भारत खडबडून जागा झाला आहे. अशा वेळीं आतांपर्यंत **राष्ट्रीय संरक्षण निधीसाठीं रु. २५,००० ची** मदत साहित्य-रस स्पर्धेनं करून आपल्या उज्ज्वल परंपरेला अधिकच उजाळा दिला.

साहित्य-रस स्पर्धेचें आणखी एक अत्यंत महत्त्वाचें कार्य हें कीं, स्थानिक ठिकाणांहून, दुय्यम प्रतीच्या शहरांतून वा गांवांतून निघणाऱ्या नियतकालिकांना **जाहिरातीच्या स्वरूपांत** दरमहा मदत करून त्यांचें जीवन सुलभ आणि सोपें केलें आहे. आर्थिक अडचणींत सांपडून कष्टप्राय होणाऱ्या कित्येक नियत-कालिकांना त्यामुळें नवसंजीवन लाभलें आहे आणि महाराष्ट्रभर जवळ जवळ ४० नियतकालिकांना ह्या स्वरूपांत साहित्य-रस स्पर्धेनें हातभार लावला आहे.

नवोदितांना केवळ पुरस्कार देऊनच त्यांच्या प्रतिभेची योग्य जोपासना होणें कठीण आहे म्हणून त्यांच्या प्रतिभाविलासाला रसिकापर्यंत नेऊन पोंहच-विण्यासाठीं **साहित्य-रस माला** ही प्रकाशन संस्था साहित्य-रस स्पर्धेच्या पाठिंब्यानेंच अस्तित्वांत आली आहे आणि तिचें '**गतिकृष्णायन**' हें पहिलेंच पुष्प 'तुकाराम बीजे'च्या शुभ मुहूर्तावर प्रकाशित होत आहे.

**अशा वैशिष्ट्यांनीं परिपूर्ण असलेली आणि भरीव कामगिरी करणारी साहित्य-रस स्पर्धा ही महाराष्ट्रांतील एकमेव कौशल्य-पूर्ण स्पर्धा आहे, हें नव्यानें सांगणें म्हणजे सूर्य शोधायला मेणबत्ती घ्या असें म्हणण्यासारखेंच आहे. आमच्या साहित्य-रस स्पर्धेचें यश स्वयंसिद्ध आहे.**

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
९३४८५
दा. क.

नीतिन मॅन्शन,
खेतवाडी ७ वी गल्ली,
मुंबई ४.

**वि. मो. दलाल,**
चालक
**साहित्य-रस स्पर्धा**

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्र
अनुक्रम ... वि: ...
क्रमांक ... नों: दि: ...
REFBK-0013485
REFBK-0013485



साहित्य-रस स्पर्धेने अनेकांच्या जीवनांत असाच
अक्षय वसंत फुलविला आहे .